CMYK

दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.

RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com lakshamaha.dhule@gmail.com lakshamaha.nsk@gmail.com

धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती | वर्ष ४ थे | अंक : २६१ वा | सोमवार दि. १७ जुलै २०२३ | किंमत : २ रु. | पृष्ठे : ६

## ताकदीचा दुरुपयोग करणार नाही: फडणवीस

**मुंबई ।** विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाला (१७ जुलै) सुरुवात होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर रविवार रोजी चहापानाचा कार्यक्रम पार पडला, विरोधकांनी त्यावर बहिष्कार टाकला.



उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, 'आम्ही त्यांना (विरोधकांना) निमंत्रण दिलं होतं, पण ते आले नाहीत.' पुढे बोलतांना त्यांनी म्हटलं की, 'आमची ताकद वाढली असून याचा आम्ही कोणताही दुरुपयोग करणार नाही.'आता आम्ही लोकहिताचे निर्णय घेणार असल्याचा विश्वास देखील फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.

### न्यूज कॉलम

## विनयभंग प्रकरणी संशयितावर गुन्ह

**धुळे ।** दागिने शरीरसंबंधाची मागणी करून विवाहितेचा विनयभंग केल्याप्रकरणी एकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला. याबाबत देवभाने (ता. धुळे) येथील २९ वर्षीय विवाहितेच्या फिर्यादीनुसार तिच्याकडे रोहिदास प्रकाश देसले ऊर्फ बाळा हा पतसंस्थेची रक्कम संकलनासाठी येत असे. पीडिता घरी एकटी असल्याचा फायदा घेऊन रोहिदास देसले याने तिचा हात धरून ओढले. तसेच हॉलमध्ये नेत मोबाईलमध्ये तिच्यासोबत फोटो काढले. नंतर शरीरसंबंध ठेवावा म्हणून फोटो व्हायरल करण्याची धमकी दिली. एप्रिल २०२३ ते ११ जुलैदरम्यान हा प्रकार घडला.

# धुळे शहरात कलाकारांचा गुण गौरव सोहळा उत्साहात संपन्न

**धुळे । प्रतिनिधी**

शहरात अखिल भारतीय नाट्य परिषद धुळे शाखा व लोकमंगल कलाविष्कार सह संस्था नाशिक विभाग शाखा धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने गुण गौरव सोहळा संपन्न झाला.

यावेळी अखिल भारतीय नाट्य परिषद नियमायक मंडळ सदस्य चंद्रशेखर पाटील यावेळी मार्गदर्शन करताना म्हणाले महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील कलाकारांना चांगल्या दर्जाचे नाट्यगृह उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. आणि त्यांचा नाट्य रसिकांना देखील आस्वाद घेता येणार आहे. तसेच जिल्ह्यात देखील लवकर नवीन सदस्य नोंदणी देखील केली जाईल. आणि कार्यालय देखील उपलब्ध करण्यात येणार आहे. तरी जास्तीत जास्त कलाकारांनी नाट्य परिषदेचे सदस्य व्हावे असे देखील म्हणाले. धुळे शहरात देखील नागरिकांसाठी नाटकांचे प्रयोग आयोजित करून आवड निर्माण केली जाते आहे. मुंबई नाटकांसाठी जास्तीत जास्त कलाकारांना संधी मिळण्यासाठी मी प्रयत्न करेल असे देखील देखील म्हणाले.

प्रा.अनिल सोनार यांनी यावेळी आयोजित केलेल्या कार्यक्रमाचे कौतुक केले. त्यामुळे या कलाकारांना प्रोत्साहन मिळाले. नाटकाकडे कसे पाहावे.तसेच त्यांनी त्यांच्या विविध नाटकांच्या प्रयोगाच्या अनुभव सांगितले. तसेच कलाकारांना मार्गदर्शन देखील केले. सारांश भावसार यांनी देखील यावेळी कलाकारांना शुभेच्छा देत कौतुक केले.

यावेळी प्रा.अनिल सोनार, अखिल भारतीय नाट्य परिषदेचे धुळे शाखेचे अध्यक्ष चंद्रशेखर पाटील, विजय मगळे, सारांश भावसार, राजु शिंदे आदी उपस्थित होते.





### पुरस्कारांचे मानकरी

**राजेश बिहाडे, विशाल महाले, विनोद फरताडे, हर्षल मराठे, शितल मराठे, संजय विसपुते, कुणाल खैरनार, सागर चांगरे, रोहित भारत, आशिष कासार, हितेश भामरे, महिर पाटील, शिवांजली सापे, मल्हार सापे, रजत परदेशी, वृषभ अहिरे, माधुरी परदेशी, प्रतिक वाघ, स्वराज सावंत, कुणाल शिंदे, किरण जाधव, सिद्धांत बागुल, विलास वाडिले, चेतन उपाध्याय, तन्मय बाविस्कर, ओम कासार, पुजा चौहान, अथर्व कुंभारे, धनंजय दिक्षित, हर्षल परदेशी, अभिजित कबाडे, ज्योती चौहान मंगळे, सिद्धांत मंगळे, सुजय भालेराव, नारायणी सोनार, विरात बागुल, राहुल मंगळे, केतकी पांचभाई, लकी रिलजा यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.**

### महाराष्ट्र शासनाचे पुरस्कार

- **१७ वी महाराष्ट्र बालनाट्य स्पर्धेत पडसाद या नाटकात भूमिकेसाठी अभिनय गुणवत्ता प्रमाणपत्र पारितोषिक नारायणी मनोज सोनार**
- **१८ वी महाराष्ट्र बालनाट्य स्पर्धेत एप्रिल फुल या नाटकात भूमिकेसाठी अभिनय गुणवत्ता प्रमाणपत्र पारितोषिक नारायणी वेदांत पंकज बागुल**
- **६० वी महाराष्ट्र राज्य हौशी नाट्य स्पर्धेत कात या नाटकात भूमिकेसाठी अभिनय गुणवत्ता प्रमाणपत्र पारितोषिक राहुल विजय मंगळे**
- **६१ वी महाराष्ट्र राज्य हौशी नाट्य स्पर्धेत प्रतिकार या नाटकात भूमिकेसाठी अभिनय गुणवत्ता प्रमाणपत्र पारितोषिक केतकी प्रशांत पचभाई**
- **४ थी महाराष्ट्र राज्य दिव्यांग बालनाट्य स्पर्धेत विधी या नाटकात भूमिकेसाठी अभिनय गुणवत्ता प्रमाणपत्र पारितोषिक लकी दीलाजा यांना महाराष्ट्र शासनाच्या वतीने पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.**

# राष्ट्रवादी पुन्हा एकत्र येण्याचा शरद पवारांना प्रस्ताव : प्रफुल्ल पटेल

**मुंबई । प्रतिनिधी**

राष्ट्रवादीतून फुटून अजित पवार आणि त्यांच्या समर्थक आमदारांनी भाजपला समर्थन देण्याच्या घेतलेल्या निर्णयानंतर आज संपूर्ण दादा गटाने ज्येष्ठ नेते शरद पवार यांची भेट घेतली. प्रफुल्ल पटेल आणि अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादीच्या नवनिर्वाचित ८ मंत्र्यांनी शरद पवार यांचे आशीर्वाद घेतले. यावेळी दादा गटाच्या सगळ्या मंत्र्यांनी शरद पवार यांची मनधरणी करण्याचा प्रयत्न केला. आम्ही सरकारला पाठिंबा दिलाय, आपणही आमच्यासोबत चला. राष्ट्रवादी पक्ष एकसंध कसा राहिल, हे पाहा, असं सांगून दादांच्या मंत्र्यांनी शरद पवार यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला.

राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाला सोमवार पासून प्रारंभ होत आहे. तत्पूर्वी आदल्या दिवशीच दादा गटाच्या सगळ्या नेत्यांनी शरद पवार यांची वाय बी चव्हाण सेंटर येथे जाऊन भेट घेतली. सगळ्या मंत्र्यांनी पुन्हा शरद पवार यांना भाजपला पाठिंबा देण्याविषयी गळ घातली. जवळपास चाळीस मिनिटे चाललेल्या चर्चेचा तपशील प्रफुल पटेल यांनी माध्यमांना सांगितला. ते म्हणाले, आमचं दैवत, आमचे नेते शरद पवार यांचा आशीर्वाद घेण्यासाठी अजित पवार, छगन भुजबळ, सुनील तटकरे, धनंजय मुंडे, हसन मुश्रीफ, दिलीप वळसे पाटील आणि बाकी सगळे मंत्रिमहोदय वाय बी चव्हाण सेंटरला वेळ न मागता आलो होतो. पवारसाहेब एका मिटिंगच्या निमित्ताने वाय बी चव्हाण सेंटर येथे आल्याचं कळलं. मग आम्ही संधी साधून त्यांची भेट घेतली, त्यांचे आशीर्वाद घेतले.

### आशीर्वाद घेण्यासाठी आलो

**अजित पवार गटाचे नेते प्रफुल्ल पटेल म्हणाले की, शरद पवार यांचे आशीर्वाद घेण्यासाठी अजित पवार यांच्यासह सर्व मंत्री वाय.बी. चव्हाण सेंटरला संधी साधून वेळ न मागता आलो होतो. यावेळी आम्ही त्यांचे आशीर्वाद घेतले असून सर्वांनी त्यांना विनंती केली आहे की, राष्ट्रवादी काँग्रेस एकसंध राहावा यासाठी मार्गदर्शन करायला हवे. मात्र, शरद पवार यांनी यावर काहीच प्रतिक्रिया दिली नाही.**



### ते वेळ न घेता अचानकच आले

**अजित पवार आणि नेत्यांनी शरद पवार यांची वेळ घेतली नव्हती. अजित पवारांनी मात्र, अचानक भेट घेत शरद पवारांची भेट घेत दिलगिरी व्यक्त केली. तर मार्ग काढण्याची काढावा म्हणत पक्ष एकसंध ठेवण्याची विनंती केली. यावर शरद पवारांनी काहीच प्रतिक्रिया दिली नाही, असे राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी स्पष्ट केले आहे.**

### कागदावर आमचा पक्ष मोठा

**जयंत पाटील म्हणाले की, अजित पवार आणि नेत्यांनी शरद पवार यांची वेळ घेतली नव्हती. मात्र, अचानक भेट घेत पक्ष एकसंध ठेवण्याचीही त्यांनी विनंती केली. यावर शरद पवारांनी काहीच प्रतिक्रिया दिली नाही असे जयंत पाटील यांनी स्पष्ट केले आहे. विरोधी पक्षातील जो पक्षाचे सर्वात जास्त आमदार असतात त्याच पक्षाचा विरोधी पक्षनेता असतो, आमच्यासोबत जवळपास १९ आमदार आहेत. तर कागदावर आमचा पक्ष मोठा असला तरीसुद्धा आमच्यातील ९ आमदारांनी सत्तेत सहभागी होत मंत्रीपदाची शपथ घेतल्याने आता ज्यांच्याकडे सर्वात जास्त आमदार असतील त्यांचा विरोधी पक्षनेता होईल.**

# चितोडरोड स्मशानभूमी येथे गॅस शवदाहिनी कामाचा शुभारंभ



**धुळे । प्रतिनिधी**

महानरपालिका क्षेत्रात मूलभूत सोई सुविधांचा विकास योजनेअंतर्गत चितोड रोड अमरधाम येथे शवदहिनी साठी व इतर उपकरणे तसेच शेड चे बांधकाम साठी आमदार फारुक शाह यांच्या प्रयत्नाने देवपूर अमरधाम व चितोड रोड अमरधाम साठी एक कोटी आठविस लक्ष रुपये मंजूर करून आणले होते आज चितोड रोड अमरधाम येथील कामाचे शुभारंभ आमदार फारुक शाह यांच्या हस्ते करण्यात आले.

धुळे शहरात कोरोना काळात अनेक लोकांचे निधन झाले त्या वेळी त्यांच्या अंत्यविधी साठी अमरधाम सुद्धा कमी पडत होते तसेच कोरोना बाधित रुग्णांना आक्सिजन ची आवश्यकता होती त्या वेळी आमदार साहेबांनी मोठ्या प्रमाणात शासना कडून निधी आणला होता त्याचीच परिणती म्हणून आज चितोड रोड अमरधाम येथे आमदार फारुक शाह यांच्या हस्ते या कामाचे शुभारंभ करण्यात आले धुळे शहरात विकासा साठी आमदार फारुक शाह यांनी कोणताच भेदभाव न करता प्रत्येक समाजाला न्याय कसा मिळेल याचा साठी प्रयत्न केले आहे या वेळी या भगातील नागरिकांनी आमदार फारुक शाह यांचे आभार मानले व सत्कार केला.याप्रसंगी आ.फारुख शाह यांच्या सोबत डॉ. दिपश्री नाईक,डॉ.बापुराव पवार, सुनिल पाटील, अतुल पाटील, मनोज गर्दे, कॉ.एल.आर.राव,भगवान वाघ,गौतम पगारे,डॉ.शकील देशमुख,प्यारेलाल पिंजारी,निजाम सैय्यद,इकबाल शाह,राकेश गाळनकर,शास्री नगर मधील दिपकुमार साळवे,.बाजीराव खैरनार, रमेश वाघ, नेरकर सर, प्रमोद पाटकर, बाळासाहेब निकुंभ, भरत परदेशी, वसंत वाघ, राजेंद्र चितोडकर, खैरनार सर,अजहर सैय्यद, सउद आलम,फैसल अन्सारी, शहजाद मन्सुरी,शाहरुख कुरेशी,आदी उपस्थित होते.यावेळी मनोज गर्दे,सुनिल पाटील,भगवान वाघ, यांनी मनोगत व्यक्त करतांना आ.शाह यांच्या कामाची स्तुती केली.राकेश गाळणकर यांनी सूत्रसंचालन केले व दीपकुमार साळवे यांनी आभार मानले.

# विद्यार्थ्याचा मृत्यू, अधीक्षक, कर्मचारी, चार मित्रांवर गुन्हा

**साक्री । प्रतिनिधी**

तालुक्यातील पिंपळनेर येथील एकलव्य रेसीडेन्सी स्कूलमधील विद्यार्थी नीलेश बोरसे याच्या मृत्यू प्रकरणी दहा महिन्यांनंतर पिंपळनेर पोलिस ठाण्यात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल झाला. वसतिगृहाचे अधीक्षक, सुरक्षा कर्मचाऱ्यांसह मृत नीलेशच्या चार मित्रांवर निष्काळजीपणाचा ठपका ठेवला .

नीलेश २ सप्टेंबरला बेपत्ता झाल्यावर पालकांना कळवले नाही. या तक्रारीवर कामकाज होऊन पोलिसांना गुन्हा दाखल करण्याचे आदेश देण्यात आले. या तक्रारीवरून सहा जणांविरुद्ध पिंपळनेर पोलिस ठाण्यात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल झाला. दरम्यान, २ सप्टेंबरला मध्यरात्री बारा वाजेनंतर मृत नीलेश व त्याचे चार मित्र हाताची साखळी करून पांझरा नदीच्या पात्रातून पिंपळनेरला जात होते. त्या वेळी ही घटना घडली होती.

# गुटख्याची तस्करी रोखली, सव्वा लाखांचा मुद्देमाल जप्त

**धुळे । प्रतिनिधी**

तालुक्यातील सावळदे फाट्यानजीक गुटख्याची वाहतूक मोहाडी पोलिसांनी रोखली असून या ठिकाणाहून १ लाख २४ हजार २११ रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी दोन जणांविरूध्द मोहाडी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सावळदे फाट्यानजीक एमएच ४८ एएक्स ३६२३ क्रमांकाच्या रिक्षातून महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेल्या राजनिवास गुटखा व विमल पानमसाला, सुगंधीत तंबाखू यांची वाहतूक केली जात होती.

मोहाडी पोलिसांनी रिक्षा पकडून त्या रिक्षातून ६ हजार ३३६ रूपयांचा राजनिवास पानमसाला, १२ हजार २२० रूपये किंमतीच विमल पानमसाला, जाफरानी जर्दाची पाकीटे १ हजार ५८४ रूपयाचे, विमल ९०० रूपये किंमतीचे, विमल १ हजार ४५२, विमल पानमसाला ३ हजार ६५१ रूपये व रिक्षा ७५ हजार रूपये असा १ लाख २४ हजार २११ रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी रिक्षा चालक अब्दूल मलीक नेहाल अहमद (वय २६ रा. मालेगाव), शाह फैजल शब्बीद अहमद यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

# विषारी साप खुराड्यात घुसला कोंबडीची ७ अंडी गिळली



### सर्पमित्रानं मोठ्या हिंमतीनं वाचवलं

**धुळे । प्रतिनिधी**

कापडणे येथील एका शेतातील कोंबडीच्या खुराड्यात विषारी नागाने प्रवेश करीत कोंबडीची सात अंडी फस्त केली. यावेळी सर्पमित्र कुणाल माळी यांनी या विषारी नागाला पकडून त्याच्या तोंडातून सात अंडी बाहेर काढत या सर्पाला जीवदान दिले. कापडणे येथील युवा शेतकरी कमलेश विश्वनाथ पाटील यांचे शेत आहे. या शेतात पाटील यांनी गुरांच्या गोठ्यातच गावरान कोंबडीचा खुराडा बनवला आहे.

या खुराड्यात एक कोंबडी आणि अंडी होती. यावेळी विषारी नागाने प्रवेश करताच कोंबडीने पळ काढला. खुराड्यात ठेवलेली सात अंडी फस्त केली. यावेळी नेहमीप्रमाणे कमलेश पाटील गेल्यावर त्यांना कोंबडीच्या खुराड्यात नाग बसलेला दिसला. यावेळी पाटील यांनी सर्पमित्र कुणाल माळी यांना संपर्क साधत शेतात बोलावून घेतले. यावेळी सर्पमित्र माळी यांनी या विषारी नागाला खुराड्यातून शिताफीने बाहेर काढत त्याच्या तोंडातील अंडी बाहेर काढून घेतली. नागाने सात अंडी एका मागे एक गिळल्याने त्याची हालचाल मंदावली होती. कापडणे गावातून आणि शेत शिवारातून कुणाल माळी यांनी पावसाळा सुरू झाल्यावर महिन्याभरात वीस पेक्षा जास्त विषारी, बिनविषारी सर्प पकडले. यात दामन, दिवळ, मण्यार, नाग, कवळ्या आदी प्रजातींचा समावेश आहे. याआधी कापडणे प्राथमिक आरोग्य केंद्रातील औषध रूममधून मध्यरात्री मण्यार सर्प पकडला असल्याची माहिती दिली. शेतात काम करत असताना लक्ष देऊन काम करावे.

# महाराष्ट्रात राहून आमच्या नशिबी मरणयातना; दुर्गम भागातील नागरिकांच्या भावना

एकीकडे शासन कोट्यवधी रुपयांचा खर्च करून शासन आपल्या दारी' आल्याचा आव आणत आहे. घरबसल्या शासकीय योजनांचा लाभ घ्यावा, असेही सांगत आहे. मात्र त्याच दुसऱ्या बाजूला आजही राज्यातील अनेक भागातील आरोग्य व्यवस्था सलाईनवरच असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. सीमाभागातील ही आदिवासी जनता अजूनही मूलभूत समस्यांशी झगडत आहे.

धुळे जिल्ह्यातील शिरपूर तालुक्यातील गुऱ्हाळपाणी ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत असलेल्या थुवानपाणी येथील गर्भवती महिलेला झोळी करून रुग्णालयात दाखल करण्याची वेळ आली. रस्त्याची सोयच नसल्याने थुवानपाणी येथील गर्भवती महिलेला चक्क बांबूंना फडके

### रस्त्याची सुविधा पुरवा

**तीन ते चार महिन्यांपूर्वी धुळे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी भुवनेश्वरी एस यांनी या क्षेत्राला भेट दिली होती. त्यावेळी त्यांना देखील थुवाणपाणीपर्यंत पायी चालत यावे लागले. त्यावेळी ग्रामस्थांनी त्यांना रस्त्याची मागणी केली होती. मात्र अद्यापही रस्त्याबाबत काही कारवाई न झाल्याने नागरिकांची प्रतीक्षा कायम आहे. या दुर्गम भागात रस्त्याची सुविधा पुरवावी, अशी मागणी होत आहे. गुऱ्हाळपाणी ग्रुप ग्रामपंचायती अंतर्गत दहा ते बारा खेडे येतात. आम्ही गेल्या कित्येक वर्षांपासुन रस्त्याची मागणी करत आहोत. मात्र याबाबत कोणीही गांभीर्य घेतलेले नाही. या क्षेत्रात रस्त्याची सुविधा पुरविण्यात याव्यात, असे राजेंद्रसिंग पावरा यांनी म्हटले.**



### रस्ते नाहीत, वाट बिकट

पक्के रस्ते नाहीत. साधं पायी चालता येत नाही, वाहन कुठून जाणार? शाळेपर्यंत जाण्यास रस्ते नाहीत, दळणवळणाची साधनेही नाहीत. रुग्णवाहिका पोचू शकत नसल्याने गरोदरमाता, स्तनदामाता यांना वेळेवर सेवा मिळत नाही. अजूनही काही आदिवासी भागातील वाड्या-वस्त्यांत एसटी पोचली नाही. आदिवासींना पायपीट करीत यावे लागते. अनेक भागातील

### अशीच घटना २०२० मध्ये देखील

**१४ मे २०२० रोजी अश्याच प्रकारची घटना थुवाणपाणी येथे घडली होती. १५ मे २०२० रोजी ही घटना अनेक वृत्तपत्रांमध्ये छापल्यामुळे विद्यमान आमदार काशीराम पावरा यांनी गुऱ्हाळपाणी येथे येऊन एका दिवसात एक डॉक्टर व नर्सची नियुक्ती करून हा प्रश्न सोडवला होता. परंतु त्या घटनेला ३ वर्षे ओलांडुन ही थुवानपाणी व निशाणपाणी येथे रस्त्याची सोय न झाल्यामुळे १६ जुलै २०२३ रोजी पुन्हा एका महिलेला झोळीत दवाखान्यात आणण्यात आले.**

### नागरी सुविधांपासून वंचित

**रस्ते, वीज, पाणी, मोबाईल कनेक्टिव्हिटी, शाळा, आरोग्य या सगळ्याच बाबी दुर्लक्षित आहेत. स्वातंत्र्य मिळून साडेसात दशक उलटूनहनही रस्ते, वीज, पाणी, आरोग्य, बससेवा अशा मूलभूत सुविधाही अजून काही वाड्या-वस्त्यांवर पोचलेल्या नाहीत.**



शोध बातमी

**पुरुषोत्तम पाटील**
मुख्य उपसंपादक
मो.७०५७०१११२६

## कराचा ‘ऑनलाइन’ विस्तार

‘गेम ऑफ स्किल’ व ‘गेम ऑफ चान्स’ या शब्दच्छलास अर्थ नाही. ऑनलाइन व ‘कॅसिनो’त खेळला जातो, त्याला ‘जुगार’ म्हणतात. यामुळे त्यावर कर लादणे तर्कसंगत मानता येते.

घरबसल्या एकटे असलात तरी अनेकांशी ‘रमी’ खेळा आणि बक्षिसे जिंका, चालू स्पर्धेत तुमचा क्रिकेटचा संघ निवडा, तो जिंकला तर चक्क बक्षीस तुमचेच, अशा आशयाच्या असंख्य जाहिराती सर्वजण दररोज अनेकदा दूरचित्रवाणीवर आणि मोबाइल फोनवरही बघत असतात. कधी गंमत म्हणून तर कधी वेळ घालवण्यासाठी अनेकजण हे खेळ खेळतात. वेळ आणि पैसेही आपोआप जातात. या ऑनलाइन खेळांवर म्हणजेच ‘गेमिंग’वर तसेच अश्वशर्यती आणि ’कॅसिनो’वर खेळाडूने गुंतवलेल्या रकमेवर (बेट) २८ टक्के दराने वस्तू व सेवा कर (जीएसटी) आकारण्याचा निर्णय या कर विषयक समितीने घेतला आहे. लगेचच ’ऑनलाइन गेमिंग’ कंपन्यांच्या किंवा ‘प्लॅटफॉर्म्स’च्या शेअरच्या किंमती कोसळल्या. या उद्योगावर हा कर लादण्याची गरज होती का? असा प्रश्न उपस्थित करत चर्चाही सुरु झाली. मुळात ऑनलाइन गेमिंग व कॅसिनो यांना ’जीएसटी’च्या कक्षेत आणण्याचा समिती बराच काळ विचार करत होती. कर नेमका कोणावर व कसा आकारावा यावर समितीत मतभेद होते. काही राज्ये कर लादण्याच्या बाजूने आहेत, तर काही राज्यांचे त्याच्या व्यवस्थापनाबद्दल वेगळे मत आहे. ऑनलाइन गेमिंग हा नवा उद्योग असल्याने त्यावर कर आकारू नये, असेही मत व्यक्त होत आहे; पण सरकार ते स्वीकारणे शक्य नाही.

उत्पन्न वाढवण्याचा हेतु

ऑनलाइन गेमिंग आणि कॅसिनो व अश्व शर्यती हे तिन्ही प्रकार वेगळे आहेत. लॉटरी व अश्व शर्यतींमध्ये जिंकलेल्या रकमेवर ती रक्कम जिंकणार्या व्यक्तीकडून प्राप्तिकर वसूल केला जातो. सध्या वाद आहे तो ‘पैसे लावण्यावर’ कर आकारण्यावर. अश्व शर्यती किंवा कॅसिनोच्या एकूण उलाढालींवर कर आकारावा; पण खेळणार्या व्यक्तीने जे पैसे ‘लावले’ आहेत (बेट) त्यावर कर आकारू नये, असा एक मत प्रवाह आहे. हा मुद्दा गोव्याच्या पर्यटनमंत्र्यांनी जोरकसपणे मांडला आहे. गोव्यात मांडवी नदीमध्ये मोठ्या नौकांवर सहा कॅसिनो आहेत, तर जमिनीवर दहा कॅसिनो आहेत. कॅसिनोमुळे रोजगाराला चालना मिळते, तसेच राज्याला कर रूपाने महसूल मिळतो, त्यात नव्या करामुळे घट होईल, असे त्यांचे मत आहे. ऑनलाइन गेमिंग हा प्रकार पूर्ण वेगळा आहे. येथे खेळाचे आयोजक व खेळणारी व्यक्ती समोरासमोर नसतात. पैशाची देव-घेव ऑनलाइन पद्धतीने होते. साधारण गेल्या पाच वर्षांत ऑनलाइन गेमिंग हा उद्योग भारतात बहरू लागला आहे. त्यातही रोजगार मोठ्या प्रमाणावर आहे व निर्माण होणार आहे. या उद्योगाची उलाढाल २०२२-२३ या वर्षात सुमारे ८५ हजार कोटी रुपये होती; पण त्यातून कर केवळ दोन टक्के म्हणजे सुमारे १७०० कोटी रुपये मिळाला, असे महसूल खात्याचे सचिव संजय मल्होत्रा यांनी सांगितले आहे. त्यांच्या मते या उद्योगावर कर आहेच, आता समितीने केवळ त्या विषयी स्पष्टीकरण दिले आहे. कारण प्रश्न त्याच्या अंमलबजावणीचा आहे. काही ऑनलाइन गेमिंग कंपन्यांनी न्यायालयात धाव घेतल्याने अडचण निर्माण झाल्याचे जीएसटी समितीचे मत आहे. त्या विरुद्ध समिती सर्वोच्च न्यायालयात दाद मागणार आहे. एका खासगी पाहणीनुसार देशातील ऑनलाइन गेमिंग उद्योगाची उलाढाल ३९ टक्क्यांनी वाढून गेल्या वर्षी ती १.६ अब्ज रुपये झाली. २०२५ पर्यंत ती २३१ अब्ज रुपयांपर्यंत पोहोचेल. गेल्यावर्षी ऑनलाइन गेम खेळणार्यांची संख्या सुमारे ४२ कोटी १० लाख होती, ती या वर्षी ४४ कोटी २० लाखांपर्यंत जाण्याचा अंदाज आहे. काही परदेशी कंपन्याही ऑनलाइन गेमिंगमध्ये आहेत. त्यांच्याकडून कर कसा वसूल करायचा याचाही विचार महसूल खाते करत आहे. उद्योग छोटा असो वा मोठा, जेथे उलाढाल आहे तेथे सरकार कर वसूल करणार यात शंका नाही. भारतातील ऑनलाइन गेमिंगचा उद्योग प्रचंड वेगाने वाढला आहे. गेल्या पाव वर्षांत त्यात देशी-परदेशी गुंतवणूकदारांनी सुमारे २.८ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक केली आहे. मोठा नफा मिळत असल्याखेरीज कोणी कोणत्याही व्यवसायात गुंतवणूक करत नाही. या नव्या उद्योगाकडे सरकारचे लक्ष जाणे स्वाभाविक आहे. कारण सरकारलाही आपले उत्पन्न वाढवायचे आहे. त्यासाठी हा ऑनलाइन खेळ उपयोगी ठरणार आहे.

# अंतराळात भारत लिहितोय नवा इतिहास



बहुचर्चित चांद्रयान-३ मिशन मोहिमेद्वारे भारताला आपली अंतराळ शक्ती जगाला दाखवायची आहे. मोहीम यशस्वी झाल्यास अमेरिका, रशिया आणि चीननंतर असे करणारा भारत हा चौथा देश ठरेल. २३ किंवा २४ ऑगस्ट रोजी लँडर आणि रोव्हर चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर उतरतील आणि १४ दिवस चंद्रावर प्रयोग करतील. तर प्रोपल्शन मॉड्यूल चंद्राच्या कक्षेत राहून पृथ्वीवरून येणाऱ्या रेडिएशनचा अभ्यास करेल.

प्रत्येक वैज्ञानिक मोहिमेला यश येतेच असे नाही. काही वेळा अपयश आले, तरी चुकांमधून शिकून पुढची मोहीम हाती घ्यायची असते. अंतराळातील संशोधन तर अधिक अवघड असते. भुता-खेतांचा देश असे हिणवल्या गेलेल्या भारताने आता परदेशातील उपग्रह प्रक्षेपित करण्यापर्यंतची मजल गाठली आहे. अनेक उपग्रह एकदाच अंतराळात पाठवण्याचा विक्रमही भारताने केला आहे. चंद्र हा तर आपला भावनिक विषय. चंद्रावर १९६९ मध्ये अमेरिकेने पहिले पाऊल टाकले. भारतानेही त्याच्या अगोदर (नाव नंतर पडले) सहा वर्षे ‘इस्रो’च्या अंतराळ संशोधनाचा पाया घालायला सुरुवात केली होती. आता चांद्रयान-३ चे यशस्वी प्रक्षेपण करून भारताने अंतराळ प्रक्षेपणाचा एक नवा अध्याय लिहिला आहे. चांद्रयान-२ मोहिमेला अपयश आले, त्यानंतर नाउमेद न होता आपण पुढच्या मोहिमेची तयारी केली. तीन वर्षे ११ महिने आणि २३ दिवसांनी शुक्रवारी भारताने चांद्रयान-३ मिशन लाँच केले. आंध्र प्रदेशमधील श्रीहरिकोटा येथील सतीश धवन अंतराळ केंद्रातून दुपारी २.३५ वाजता बाहुबली रॉकेट एलव्हीएम३-एम४ द्वारे ते अवकाशात पाठवले. १६ मिनिटांनंतर चंद्रयान रॉकेटद्वारे कक्षेत स्थापित करण्यात आले. या मोहिमेद्वारे भारताला आपली अंतराळ शक्ती जगाला दाखवायची आहे. मोहीम यशस्वी झाल्यास अमेरिका, रशिया आणि चीननंतर असे करणारा भारत हा चौथा देश ठरेल. चांद्रयान-३ अंतराळयानामध्ये तीन लँडर/रोव्हर आणि प्रोपल्शन मॉड्यूल आहेत. सुमारे ४० दिवसांनंतर म्हणजेच २३ किंवा २४ ऑगस्ट रोजी लँडर आणि रोव्हर चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर उतरतील. हे दोघेही १४ दिवस चंद्रावर प्रयोग करतील, तर प्रोपल्शन मॉड्यूल चंद्राच्या कक्षेत राहून पृथ्वीवरून येणाऱ्या रेडिएशनचा अभ्यास करेल.

या मिशनच्या माध्यमातून ‘इस्रो’ चंद्राच्या पृष्ठभागाचा वेध घेण्याचा प्रयत्न करेल. माती आणि धूळ यांचा अभ्यास करेल. चांद्रयान-३ चे बजेट सुमारे ६१५ कोटी रुपये आहे. अलीकडील ‘आदिपुरुष’ या चित्रपटाचे बजेट ७०० कोटी रुपये होते. याचा अर्थ अन्य देशांपेक्षा आपण किती खर्चाची चांद्र मोहीम हाती घेतली आहे, हे लक्षात येते. चार वर्षांपूर्वी पाठवलेल्या चांद्रयान-२ चा खर्च ६०३ कोटी रुपये होता. या मिशनद्वारे भारत जगाला सांगू इच्छितो की, आपली चंद्रावर सॉफ्ट लँडिंग करण्याची आणि तेथे रोव्हर चालवण्याची क्षमता आहे. त्यामुळे भारतावरील जगाचा विश्वास वाढेल. त्याचा उपयोग भारताला जगातील इतर देशांमधून अंतराळ व्यवसायवाढीसाठी होईल. भारताने आपल्या ‘हेवी लिफ्ट लाँच व्हेईकल एलव्हीएम३-एम ४’ वरून चांद्रयान प्रक्षेपित केले. त्यातून या वाहनाची क्षमता जगाला दाखवून दिली. यापूर्वी ॲमेझॉनचे संस्थापक जेफ बेझोस यांच्या ‘ब्लू ओरिजिन’ कंपनीने इस्रोचे एलव्हीएम- ३ रॉकेट वापरण्यात रस दाखवला होता. ‘ ब्लू ओरिजिन’ ला एलव्हीएम-३ व्यावसायिक आणि पर्यटन हेतूंसाठी वापरायचे आहे. एलव्हीएम-३’द्वारे ‘ब्लू ओरिजिन’ आपल्या क्रू कॅप्सूलला नियोजित ‘लो अर्थ ऑर्बिट (एलईओ) स्पेस स्टेशन’वर घेऊन जाईल. चंद्राचे ध्रुवीय प्रदेश इतर प्रदेशांपेक्षा बरेच वेगळे आहेत.

चंद्रावर अनेक भाग असे आहेत, जिथे सूर्यप्रकाश कधीच पोहोचत नाही आणि तापमान-२०० अंश सेल्सिअसपर्यंत खाली जाते. अशा परिस्थितीत बर्फाच्या रूपात अजूनही पाणी असू शकते, असा शास्त्रज्ञांचा अंदाज आहे. भारताच्या २००८ चांद्रयान-१ मोहिमेने चंद्राच्या पृष्ठभागावर पाण्याची उपस्थिती दर्शवली होती. या मोहिमेची लँडिंग साइट चांद्रयान-२ सारखीच आहे; मात्र या वेळी क्षेत्रफळ वाढवण्यात आले आहे. चांद्रयान-२ मधील लँडिंग साइट ५०० मीटर बाय ५०० मीटर इतकी होती. आता, लँडिंग साइट चार किलोमीटर बाय २.५ किलोमीटर आहे. सर्व काही ठीक राहिल्यास, चांद्रयान-३ चंद्राच्या दक्षिण ध्रुवाजवळ सॉफ्ट लँड होणारे जगातील पहिले अंतराळयान बनेल. पूर्वीची सर्व अंतराळयाने चंद्राच्या विषुववृत्ताच्या उत्तरेला किंवा दक्षिणेला काही अंश अक्षांशांवर उतरली आहेत. या वेळी लँडरच्या चार कोपऱ्यांवर चार इंजिन आहेत; पण गेल्या वेळी मध्यभागी असलेले पाचवे इंजिन काढून टाकण्यात आले आहे. याशिवाय फायनल लँडिंग दोन इंजिनांच्या मदतीने केले जाईल. त्यामुळे दोन इंजिने आपत्कालीन परिस्थितीत काम करू शकतील. अधिक इंधन सोबत वाहून नेण्यासाठी पाचवे इंजिन काढून टाकण्यात आले. चंद्रावर १४ दिवस रात्र आणि १४ दिवस प्रकाश असतो. रात्रीच्या वेळी तापमान-१०० अंश सेल्सिअसच्या खाली जाते. चांद्रयानचे लँडर आणि रोव्हर सोलर पॅनलमधून ऊर्जा निर्माण करतील. त्यामुळे ते १४ दिवस वीजनिर्मिती करतील; पण रात्रीच्या वेळी वीजनिर्मिती प्रक्रिया बंद होईल. वीजनिर्मिती न झाल्यास इलेक्ट्रॉनिक उपकरणे कडाक्याची थंडी सहन करू शकणार नाहीत आणि खराब होतील.

चांद्रयान-३ ने अवकाशात यशस्वी झेप घेतली आणि एकच आनंदोत्सव साजरा करण्यात आला. आता पुढील ४२ दिवस ‘इस्रो’तील शास्त्रज्ञांचे लक्ष या यानाकडे असणार आहे. या मोहिमेच्या यशस्वी उड्डाणाचा आनंद इस्रोतील अधिकाऱ्यांच्या चेहऱ्यावरही दिसून आला. चंद्रावर सुरक्षित पोहोचणे, तिथे वैज्ञानिक उपकरणे काही काळ सुसज्ज ठेवणे आणि काही वैज्ञानिक प्रयोग करणे ही या मोहिमेची मुख्य उद्दिष्टे आहेत.

चंद्राच्या पृष्ठभागावर अपघात होऊ न देता यशस्वीपणे यान उतरवण्याची अवघड कामगिरी आजवर फक्त रशिया, अमेरिका आणि चीन या तीन देशांनीच करून दाखवली आहे. ही कामगिरी करून दाखवणारा चौथा देश म्हणून आपली ओळख निर्माण करण्याची भारताची धडपड सुरू आहे. चांद्रयान-२ मोहिमेदरम्यान तांत्रिक अडचणी निर्माण होऊन भारताच्या पदरी अपयश आले होते. अलीकडेच भारताने ‘नासा’बरोबर अंतराळ संशोधनासंबंधीचा शांतता करार केला आहे. म्हणजेच या संशोधनाचा उपयोग फक्त उपकारक कामांसाठीच केला जाईल. चांद्रयान-३ मुळे भारताला चंद्रासंबंधीच्या अनेक गोष्टी समजतील; तसेच पुढच्या चंद्र मोहिमांसाठीसुद्धा याची बरीच मदत होईल. चंद्राच्या पृष्ठभागाच्या साधारण १०० किलोमीटर परिसरात पोहोचल्यानंतर चांद्रयानामधले दोन भाग सुटे होतील आणि चंद्रावरच राहणारा भाग अलगद उतरण्यासाठी सज्ज होईल.


‘इस्रो’च्या म्हणण्यानुसार यासाठी अत्यंत आधुनिक प्रकारचे तंत्रज्ञान वापरले आहे. यामध्ये चंद्रावर अलगद उतरण्याची व्यवस्था आहे. तसेच वाटेत येणारे अडथळे टाळणे आणि त्यापासून आपल्याला इजा होऊ न देणे अशी व्यवस्था या यानामध्ये आहे. चंद्रावर नेमकी कशी परिस्थिती असेल यासाठीच्या अनेक चाचण्या ‘इस्रो’ने घेतल्या आहेत. उदाहरणार्थ चंद्रावरच्या अतिशीतल वातावरणासारखे वातावरण कृत्रिमरीत्या निर्माण करणे; तसेच चंद्राच्या पृष्ठभागावर यान उतरवल्यानंतर नेमके काय होईल; यासंबंधीचे प्रयोग अशा गोष्टी ‘इस्रो’ने तपासल्या आहेत. चंद्रयान-३ यंत्रणेचे तीन मुख्य भाग म्हणजे रोव्हर, लँडर आणि प्रपोल्शन इंजिन. रोव्हर यंत्रणा चंद्राच्या पृष्ठभागाचा अंदाज घेणे, त्याची वैज्ञानिक मोजमापे करणे, पृष्ठभाग तपासणे अशी कामे करेल. पृथ्वीकडे ही माहिती पाठवण्यासाठी लँडरचा वापर होईल. प्रपोल्शन यानाला गती देण्यासाठी वापरले जाईल. योगायोगाची बाब म्हणजे २० जुलै रोजी जग आंतरराष्ट्रीय चंद्रमा दिवस साजरा करण्याच्या तयारीत असताना चंद्राचा अभ्यास करण्यासाठी भारताने त्याच्या दिशेने घेतलेली मोठी उडी दुधात साखरेसारखी ठरेल.

चांद्रयान-३ मध्ये ‘स्पेक्ट्रो-पोलारोमेट्री ऑफ व्हिजिबल प्लॅनेट अर्थ’देखील आहे, जे आपल्या शास्त्रज्ञांना चंद्राभोवती फिरणाऱ्या किरकोळ ग्रहांची आणि आपल्या सौरमालेबाहेरील इतर ग्रहांची माहिती गोळा करण्यास सक्षम करेल. म्हणूनच आपली ही मोहीम केवळ भारतासाठीच नाही तर संपूर्ण जगाच्या वैज्ञानिक समुदायासाठी महत्त्वाची आहे, असे म्हटले जात आहे. या मोहिमेबाबतची दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे हे लँडर अद्याप कोणतीही माहिती उपलब्ध नसलेल्या चंद्राच्या पृष्ठभागावर जाणार आहे. म्हणूनच या मोहिमेमुळे आपल्या पृथ्वीचा एकमेव नैसर्गिक उपग्रह असणाऱ्या चंद्राच्या माहितीत आणखी वाढ होणार, हे निश्चित आहे. या कारणाने भविष्यातील अंतराळ संशोधनाची क्षमता चंद्रावरच नाही, तर इतर ग्रहांबाबतही विकसित होईल. याला ‘भारतीय चंद्र अन्वेषण कार्यक्रम’ असेही संबोधले जाते. भारताने २००८ मध्ये आपली पहिली चंद्र मोहीम चांद्रयान-१ प्रक्षेपित केली. त्यावर ऑर्बिटर आणि इम्पॅक्ट प्रोबदेखील होते; परंतु ते शॅकलेटॉन क्रेटरजवळ क्रॅश झाले. पुढे या जागेला ‘जवाहर पॉइंट’ असे नाव देण्यात आले. भविष्यातील आर्टेमिस मिशनअंतर्गत, नासा २०२५ पर्यंत पुन्हा एकदा मानवाला चंद्रावर उतरवण्याच्या योजनेवर काम करत आहे. जपान, दक्षिण कोरिया, चीन आणि रशिया हे देशदेखील आपापल्या चंद्र मोहिमांवर काम करत आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अलीकडेच पार झालेल्या अमेरिका दौऱ्यात भारत या आर्टेमिस करारात अधिकृतपणे सामील झाला. अशा प्रकारे भारतासह बरेचसे देश चांद्रमोहिमेवर मोठा खर्च करत असल्यामुळे काहीजण याला नव्या युगाची ‘स्पेस रेस’ म्हणत आहेत, तर काहीजण ही आपली तांत्रिक क्षमता दाखवण्याची संधी असल्याचे सांगत आहेत. या पार्श्वभूमीवर भारताचा विचार केल्यास चीनशी आपली स्पर्धा नाकारता येत नाही. भारताच्या या शेजारी देशाने चांग-ए-६, चांग-ए-७ आणि चांग-ए-८ मोहिमांना मान्यता दिली असून रशियासोबत चंद्रावर संशोधन केंद्र बांधण्याचीही त्यांची योजना आहे. पण अंतराळ शर्यतीव्यतिरिक्तही अशा सर्व मोहिमा भविष्यातील चंद्र मोहिमांसाठी खूप महत्त्वाच्या आहेत. मंगळ मोहिमेसंदर्भातही या मोहिमांना विशेष महत्त्व आहे. पृथ्वीपासून दूर अंतराळात जाण्यापेक्षा चंद्रावर जाण्यासाठी कमी इंधन लागते. खेरीज भविष्यातील काही मोहिमांमध्ये अशा महत्त्वाच्या गोष्टीही चंद्रावर पाठवल्या जातील, जेणेकरून या दशकात मानव तेथे दीर्घकाळ राहू शकतील. त्या दृष्टीने हे महत्त्वाचे पाऊल ठरते.

**- प्रा. नंदकुमार गोरे**

## शब्दकोडे-१२२



**आडवे शब्द**

१. खुशालचंद, भटक्या ४. संतोषजनक ९. कोर्टातील खटला ११. माया, प्रेम १२. रानरेडा १३. रायगडाचा प्रसिद्ध कडा १५. तर्क, अंदाज १६. प्रजा, रयत १७. हस्त पण नक्षत्र नव्हे १८. सत्त्व १९. श्वसनाचा अवयव २०. चेहरा, मुख २१. पोळ्या करण्याचे जोडसाधन २३. न दबणारे, टणक २४. वाकलेला २५. चिखल २६. बेचव, कंटाळवाणे २७. जकात, वसूल करणारा अधिकारी २९. बोचकारा ३१. दात ३२. असह्य वेदना ३५. चांदी ३६. हिरवा (हिंदी) ३९. कठोर, कडक ४१. तत्काळ योग्य उत्तर देणारा ४४. प्रमाणापेक्षा जास्त ४६. मूळ आधार ४७. ढग ४९. जाती, कुळ ५०. कलावंत ५३. प्रार्थना, उपासना ५४. शांत करणे ५६. भजनात येणारा भला-चांगला ५७. पुष्परस ५८. एकदम थांबणे ६१. नाराजीतून आलेली खंत ६२. आवडता, प्रिय ६५. रमापती ६८. शूर पुरुष ७०. देव, परमेश्वर ७१. अस्वल ७३. गणपती ७५. बैलाचा सण ७६. निर्बुद्ध ७७. झकास ७८. गोष्टीतला दुष्ट

**उभे शब्द**

२. हातोहात, त्वरेने ३. गाडीचे छत ४. समानता ५. आई ६. शहरप्रमुख, कोतवाल ७. लबाडीचा हेतू ८. वटवट, बडबड ९. किंमत १०. वेडावाकडा ११. चिंतन १४. जोराने आवळून बांधणे १५. दुर्लक्ष करणे १६. आईवडील १७. वेदना २०. विहीर २१. नाणी पारखणारा २२. लत्ताप्रहार २३. व्यायाम २४. नम्रतेने मान झुकवलेला २५. पक्ष्याचा उडण्याचा अवयव २८. तोफगाडी ३०. मोजकेपणा, मितता ३३. मरेपर्यंत ३४. निराश ३७. एक गड्डा पानभाजी ३८. चंद्र ४०. मुस्लिमांचा उपवासाचा महिना ४२. समुद्र ४३. छोटा, लहान ४४. गुन्हा ४५. शूर ४६. बाळभाषेत पाणी ४८. दहाचा समुदाय ५१. भांडणे लावणे ५२. नेहमी रडणारा ५३. आंब्याचे बन ५५. सापाची एक जात ५६. शरीर (हिंदी) ५९. अजा, शेळी ६०. शेतातील उपकरणे ६३. भित्रा ६४. मऊ ६६. तपास, शोध ६७. क्रिकेटमधील धाव ६९. जीभ ७२. तालासुरांची गट्टी जमते ती जागा ७४. प्राण्यांचे नैसर्गिक अस्त्र

### शब्दकोडे १२१ चे उत्तर

**आडवे उत्तर**

१.कडेकोट ४.वारेमाप ७.नतमस्तक ११.करडई १३.गरम १५.वास १६.चरा १८.वरण २०.हाटक २२.खनन २४.राम २५.टच २६.माळी २७.लगड २९.वसंत ३१.नायक ३२.माकड ३४.हराम ३५.बाका ३६.डर ३८.नावडतीचे मीठ ४०.बारका ४२.सकटनिकट ४६.नायनाट ४७.जनकजननी ५०.कमळ ५२.नगर ५३.पत्रास ५५.टक ५६.कमालकिमान ६०.उमर ६१.रविवार ६२.अट ६४.सरकार ६६.आदानप्रदान ६८.चाकवत ७०.खारट ७१.समवेत ७३.खडा ७४.रामरक्षा ७७.लांडगा आला रे आला ८१.काजळ ८२.कपटी ८३.वर ८४.शीतल ८५.कानन

**उभे उत्तर**

१.कडवट २.कोकण ३.टर ४.वाईट ५.माग ६.परखड ८.तवा ९.मसलत १०.कचरा १२.डहाळी १४.मन १७.रामराम १९.रचनाकर २१.कलकलाट २३.नव २६.माकड २८.गड ३०.संमती ३३.सावट ३४.हमी ३४अ.राठ ३५.बाबागाडी ३७.रसना ३८.नाक ३९.चेतक ४१.कानामात्राउकार वेलांटी ४३.कटकट ४४.निखळ ४५.पनीर ४७.जहाल ४८.जनन ४९.नग ५१.मकर ५४.समर ५६.कवायत ५७.मार ५८.किल्लेदार ५९.खसखस ६२.अदाकार ६३.टन ६५.पोचा ६६.आखाडा ६७.नटराज ६९.कमला ७२.तड ७३.खलाशी ७५.मळका ७६.क्षालन ७८.गाव ७९.आर ८०.रेघ ८१.काल

## एसटी आगाराकडे लक्ष कोण देणार?

आपल्या देशाच्या स्वातंत्र्यानंतर १९४८ साली प्रवासी वाहतूक करण्यासाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची स्थापना करण्यात आली. ‘प्रवाशांच्या सेवेसाठी’ हे ब्रीदवाक्य मिरविणाऱ्या एसटीचे ‘सुरक्षित आणि अपघातविरहित बस सेवा’ हे मुख्य ध्येय आहे. राज्यात पहिली एसटी १ जून, १९४८ रोजी पुणे ते अहमदनगर या मार्गावर सुरू झाली. त्यानंतर अनेक ऊन - पावसाळे व विविध संकटांचा सामना करीत करीत आज एसटीने सुवर्णमहोत्सवी वर्षात रुबाबात पदार्पण केले. मात्र याचा कुठे गाजावाजा झालेला दिसून येत नाही. सध्या मात्र एसटी आगारांची दुर्दशा झालेली दिसते. त्यात पावसाळा चालू असून रस्तेच काय आगार सुद्धा खड्डेमय झालेले दिसून येत आहेत.

राज्यात आजही लालपरीचा काळ सुखाचा असे म्हटले जाते. कारण खेडोपाड्यात नागरिकांचे प्रमुख वाहतुकीचे साधन म्हणून एसटी मानली जाते. मात्र अलीकडच्या काळात एसटीबरोबर एसटी आगारांकडे सुद्धा दुर्लक्ष होताना दिसते. राज्यात २५० एसटी आगार आहेत. काही एसटी आगारात एसटी आल्यावर जसे चिरे खणीवर ट्रक आल्यावर धूळ जशी उडते तसे काहीसे वातावरण निर्माण होते. हे चित्र पावसाळ्यापूर्वी पाहिले आहे. तेव्हा एसटी आगाराचा परिसर स्वच्छ व डांबरीकरण असणे अतिशय महत्त्वाचे आहे. इतकेच काय बऱ्याच ठिकाणी खडी टाकलेला परिसर दिसतो. इमारतीच्या भिंती तर स्टार व पानाच्या पिचकारीने रंगलेल्या. तेव्हा हे चित्र बदलणे आवश्यक आहे. काही आगारात समाधानकारक परिस्थिती असली तरी काही खूपच खराब परिस्थिती पाहायला मिळते. विशेष म्हणजे कोकण विभागातील रस्त्यांचे चौपदरीकरणाचे काम सुरू असून त्याप्रमाणे एसटी आगारांची सुद्धा डागडुजी होणे गरजेचे आहे. प्रवासी हा महत्त्वाचा घटक असल्याने त्यांचा प्रवास सुखाचा व्हायला हवा. असे प्रत्येकाला वाटत असते. मात्र एसटी आगारांची दुर्दशा झालेली दिसते. त्याची डागडुजी झालीच पाहिजे.

आगारात असणाऱ्या कॅंटरिंगची सुद्धा दुर्दशा पाहायला मिळते. तिची डागडुजी होणे आवश्यक आहे. बोर्ड एक आणि एसटी लावली जाते तीसऱ्या ठिकाणी तेव्हा प्रवाशांकडे सामान असल्यामुळे धावा धाव करावी लागते. प्रवाशांच्या माहितीसाठी सूचना फलक योग्य ठिकाणी व प्रवाशांना ठळक दिसेल, अशा ठिकाणी लावला पाहिजे. काही ठिकाणी फलक धूळखात पडलेले दिसतात. महत्त्वाची बाब म्हणजे गाडीत प्रथमोपचाराची पेटी असते मात्र त्यात काहीच नसते. त्यामध्ये चालक व वाहकांच्या सोयकडे दुर्लक्ष केला जातो. त्यांना उत्तमप्रकारे राहायची सोय दिसत नाही. तेव्हा आता जरी एसटीचे शासनामध्ये विलीनीकरण करण्यात आले नाही तरी शासनाला एसटीच्या आगाराकडे लक्ष द्यावेच लागेल.

**समाप्तः**

**- रवींद्र तांबे**

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**‘लक्ष महाराष्ट्र’ नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

# नृत्य, वादन, स्वरांनी 'मल्हार' महोत्सवात भरले अनोखे रंग

**नाशिक । प्रतिनिधी**

येथील कालिदास कलामंदिरात साउंड ऑफ मल्हार अर्थात मल्हार महोत्सवात नृत्य, गायन, वादन या त्रिवेणी सादरीकरणाने रसरंगाची अनोखी धमाल उडवून दिली. नूपुर नाद, पुणे आणि मुसोमिंट यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी सायंकाळी या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

महोत्सवात रेखा नाडगौडा ह्यांच्या कीर्ती कला मंदिरच्या विद्यार्थिनींनी गणेश वंदना ही कथक समूह रचना सादर केली. सुंदर नादमय





सादरीकरणाने रसिक भारावले. नंतर प्रथितयश भरतनाट्यम नृत्य कलाकार डॉ. स्वाती दैठणकर आणि नूपुर दैठणकर यांनी अर्धनारी नृत्य सादर केले. मूर्तिमंत शिव पर्वतीच रंगमंचावर अवतरले होते. नंतर 'बाग पावस ऋतु' या रचनेत महाकवी कालिदास व भरत




मुनी यांच्या आधारे अष्टनायिका सादर केल्या. हा नाशिकमध्येच शुभारंभ केला असल्याचे आयोजिका स्वाती दैठणकर यांनी सांगितले. वासकसज्जा, प्रोशीत भर्तृका, खंडिता अशा विविध नायिका त्यांनी ताकदीने सादर केल्या. त्यांना नीति नायर, पंचम उपाध्याय आणि संजय शशिधरण यांनी साथसंगत केली.

त्यानंतर अथर्व वैरागकर यांचे शास्त्रीय गायन झाले. त्यांनी मेघ राग संथ लयीत सुरुवात करून हळू हळू द्रुत लय पकडली आणि रसिकांना डोलायला लावले त्यानंतर ठुमरी सादर केली. माधव लिमये यांनी तबला साथ देताना अफलातून तुकडा सादर केला तर कार्तिक स्वामी यांनी त्याला उत्तम साथ दिली. दमदार आवाज व आत्मविश्वास यामुळे गायन रंगले. कार्यक्रमाची सांगता आंतरराष्ट्रीय ख्यातीचे संतूर वादक डॉ धनंजय दैठणकर आणि त्यांचे पुत्र व शिष्य निनाद दैठणकर यांच्या अभिनव संतूर जुगलबंदीने झाली. बाहेर झिमझीम पाऊस बरसत असताना संतूरच्या अनोख्या वादनाने रसिकांना स्वर्गीय वातावरणात नेले. त्यांना अजिंक्य जोशी यांनी तबला साथ केली. मोजकेच सादरीकरण, नाशिक व पुण्याच्या कलाकारांची भरपूर तयारी यामुळे कार्यक्रम चढत्या क्रमाने रंगत गेला. रसिकांनी टाळ्यांचा कडकडाट करून कलाकारांना दाद दिली.

# कामगारांचे शोषण करणारे कायदे नको, कामगार विकासाचे कायदे हवेत

**राष्ट्रीय श्रमिक आघाडी संघटनेचे अध्यक्ष, कामगार नेते यशवंत भोसले यांची मागणी**

**नाशिक । प्रतिनिधी**

कामगारांचे शोषण करणारे कायदे नकोत, कामगार विकासाचे कायदे हवेत. केंद्र व राज्य सरकारकडे यासंदर्भात मागणी करण्यात येणार आहे. अशी माहिती राष्ट्रीय श्रमिक आघाडी या संघटनेचे अध्यक्ष व कामगार नेते यशवंत भोसले यांनी पत्रकार परिषदेत दिली. सरकारचे कामगार कायदे हे भांडवलदार आणि उद्योगधार्जिणे असल्याचा आरोप त्यांनी केला असून या धोरणामुळे कामगार हे बेरोजगार होणार असून देशात यातून अराजकता माजू शकते अशी भीतीही त्यांनी यावेळी व्यक्त केली.

राष्ट्रीय श्रमिक आघाडी (संलग्न नॅशनल फ्रंट ऑफ इंडियन ट्रेड युनियन) या संघटनेचे अध्यक्ष व महाराष्ट्रतील कामगार नेते यशवंत भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली कामगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. शनिवारी दुपारी ४ वाजता शुभलक्ष्मी मंगल कार्यालय, दिव्या ॲडलॅब सिनेमासमोर, त्रिमूर्ती चौक, सिडको, नाशिक येथे



आयोजित मेळाव्यात विविध प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. विशेषतः कामगारांचे शोषण करणारे कायदे नको, कामगार विकासाचे कायदे हवेत अशी आग्रही मागणी केंद्र सरकार व राज्य सरकारकडे करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

या संदर्भात पत्रकार परिषदेत सविस्तर माहिती देताना महाराष्ट्र राज्यातील कामगार नेते यशवंत भोसले यांनी सांगितले की, सध्या सर्व उद्योग, कारखान्यांमध्ये तसेच महापालिका व महाराष्ट्र शासनाच्या प्रत्येक विभागामध्ये बेकायदेशीर कंत्राटी कामगारांचा वापर करून त्यांचे शोषण सुरू आहे. वास्तविक पाहता कायद्यानुसार कंत्राटी पद्धतीने काम करीत असलेल्या कामगारांना सेवेत कायम करावे, तसेच कायम कर्मचार्यांप्रमाणे त्यांना वेतन देण्यात यावे, असे कायद्यामध्ये नमूद केलेले आहे; परंतु त्याची अंमलबजावणी होत नाही. यासंदर्भात मार्गदर्शन करण्यासाठी मी नाशिक शहरात आलो आहे असे कामगार नेते यशवंत भोसले यांनी सांगितले.

त्याचप्रमाणे भोसले पुढे म्हणाले की, सध्या जे काही कामगार कायम आहेत, त्यांना बेकायदेशीरपणे कामावर कमी करणे, त्यांच्या संघटनेबरोबर चर्चा न करता वेतनवाढीच्या करारास विलंब लावणे, संघटना स्थापन केली म्हणून सूडबुद्धीने कामगार नेत्यांवर कारवाई करणे, अशा पद्धतीने काही कंपन्यांचे व्यवस्थापन कामगारांना वागणूक देत आहे. त्यामुळे या अन्यायाविरुद्ध कायदेशीर व आंदोलनात्मक लढा उभारला जाईल असा इशारा भोसले यांनी यावेळी दिला.

महत्वाची बाब म्हणजे नवीन कामगार कायद्यामुळे कायम कामगार पद्धत बंद होणार असून, कामगार संघटनादेखील संपुष्टात येणार आहेत. नवीन कामगार धोरण काय आहे, याबाबतदेखील या मेळाव्यात भोसले यांनी मार्गदर्शन केले. सध्या ज्या उद्योग आणि कंपन्यांमध्ये वादविवाद सुरू आहेत, तेथील कामगार संघटनांच्या प्रतिनिधींची प्रत्येक कंपनीमध्ये स्वतंत्र बैठक घेऊन आम्ही मार्गदर्शन करणार आहोत, असेही भोसले यांनी स्पष्ट केले.

तसेच सर्व उद्योजकांच्या व कंत्राटदारांच्या संघटना आहेत. ते कामगारांची कशी पिळवणूक करायची, याबाबतचे धोरण एकत्रितपणे राबवीत असतात, तसेच शासनाला जाऊन भेटतात. त्याचप्रमाणे पोलिसांमार्फत एकत्र येऊन कामगारांची आंदोलने संपुष्टात आणतात असा आरोपही यशवंत भोसले यांनी केला. यासाठी कामगारांनी व संघटनांनी एकत्र येणे ही काळाची गरज आहे, असे आवाहन भोसले यांनी केले. या पत्रकार परिषदेस संघटनेचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.



## इफत पटेलचा आ. ढिकले यांच्या हस्ते सत्कार

**जुने नाशिक । प्रतिनिधी**

जेलरोड परिसरातील जागृतीनगर येथील डीएफडी माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थिनी इफत मन्सूर पटेल हिने ९०.४० टक्के गुण मिळवून दहावी बोर्ड परीक्षेत शाळेत दुसरा स्थान पटकाविल्याबद्दल आ. राहुल ढिकले यांच्या हस्ते तिचा सत्कार करण्यात आला.

पाटीदार भवन येथे नुकताच हा सत्कार सोहळा झाला. यावेळी शाळेतील इतर गुणवंत विद्यार्थ्यांचाही मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमावेळी शाळेचे मुख्याध्यापक दत्तात्रय धात्रक, इफतचे वडील मन्सूर पटेल, हनीफ पटेल आदि उपस्थित होते. इफतच्या या घवघवीत यशाबद्दल तिचे कुटुंबीय, नातेवाईक, परिसरातील नागरिक, शाळेतील शिक्षक व शिक्षिकावृंद आदींनी तिचे कौतुक केले आहे.

प्रोसेस जमा

अॅड. निलेश पी. कुलकर्णी
निशाणी नं.६

**जाहिर नोटीस**

**धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश (व.स्तर) सो. यांचे कोर्टात**

दि.कि.अर्ज नं.८२६/२०२३

कानुबाई उर्फ कासुबाई काळु पाटील (मयत) वारस
शंकर काळु पाटील (मयत मुलगा) वारस
१) राजसबाई शंकर पाटील उ.व.-८५, धंदा-घरकाम
रा.मेहेरगाव, ता.जि.धुळे
माधवराव शंकर पाटील (मयत मुलगा) वारस
२) मिनाबाई माधवराव सुर्यवंशी (पाटील) उ.व.-५१, धंदा- घरकाम
३) चेतन माधवराव सुर्यवंशी (पाटील) उ.व.-२५, धंदा- शिक्षण
नं. १ ते ३ रा. मेहेरगाव, ता. जि. धुळे
४) आशाबाई अधिकार पाटील उ.व.-५४, धंदा - घरकाम
रा. मु. पो. जवखेडा, ता. अमळनेर, जि. जळगाव
५) अमृत शंकर सुर्यवंशी पाटील उ.व.-५१, धंदा - नोकरी
रा. मु. पो. यावल, ता. यावल, जि. जळगाव
गोरख काळु पाटील (मयत मुलगा) वारस
६) कमलाबाई गोरख पाटील उ.व.-७२, धंदा- घरकाम
७) संतोष गोरख पाटील उ.व.-५२, धंदा - ड्रायव्हर
८) गुलाब गोरख पाटील उ.व.-४५, धंदा- ड्रायव्हर
नं. ६ ते ८ रा. मेहेरगाव, ता. जि. धुळे
९) रेखाबाई राजेंद्र देवरे उ.व.-५१, धंदा - घरकाम
रा. अवधान, ता. जि. धुळे
रूपाबाई उर्फ भगीरथबाई काशिराम देवरे (मयत) वारस
हिलाल काशिराम देवरे (मयत) वारस
सुमनबाई हिलाल देवरे (मयत) वारस
१०) शरद हिलाल देवरे उ.व.-४३, धंदा- ड्रायव्हर
सिताराम काशिराम देवरे ( मयत ) वारस
११) हिराबाई सिताराम देवरे उ.व.-५२, धंदा - घरकाम
१२) महेंद्र सिताराम देवरे उ.व.-४०, धंदा-ड्रायव्हर
१३) जितेंद्र सिताराम देवरे उ.व.-३८, धंदा- ड्रायव्हर
ज्ञानेश्वर काशिराम देवरे (मयत) वारस
१४) निर्मलाबाई ज्ञानेश्वर देवरे उ. व. ५८, धंदा-घरकाम
नं.१० ते १४ रा.मु.पो.म्हसदी, ता.साक्री, जि.धुळे
१५) जयश्री जगदिश खंडेराव उ.व.-३१, धंदा - घरकाम
१६) कावेरी प्रविण खंडेराव उ.व.-२८, धंदा- घरकाम
नं. १५ व १६ रा. मु. पो. खर्दे खु., ता. जि. नंदुरबार
१७) सारिका ज्ञानेश्वर देवरे उ.व.-२४, धंदा-घरकाम
रा. मोहाडी, ता.जि.धुळे
१८) प्रसाद ज्ञानेश्वर देवरे उ.व.-२१, धंदा-शिक्षण रा.मु.पो.म्हसदी, ता.साक्री, जि.धुळे लिलाबाई श्रावण पवार (मयत) वारस
१९) दिलीप श्रावण पवार उ.व.-४९, धंदा-शेतीकाम
रा.मु.पो. जखाणे, ता.शिंदखेडा, जि.धुळे
२०) मिनाबाई गोकुळ पाटील उ.व.-४८, धंदां-शेतीकाम
रा.मु.पो. खर्दे खु., ता.जि.नंदुरबार
२१) कल्पनाबाई बाळु नांद्रे उ.व.-५३, धंदा-घरकाम
रा.मु.पो. छडवेल, ता.साक्री, जि.धुळे .....अर्जदार

**विरुध्द**

**कुणीही नाही** ...सामनेवाला

कानुबाई उर्फ कासुबाई काळु पाटील (मयत)
रूपाबाई उर्फ भगीरथबाई काशिनाथ देवरे (मयत)

मयत कानुबाई उर्फ कासुबाई काळु पाटील व मयत रूपाबाई उर्फ भगीरथबाई काशिराम देवरे यांचे नावे असलेल्या मिळकती खालील प्रमाणे -

१) मौजे मेहेरगाव, ता. जि. धुळे येथील शेत गट नं. ३२५/१, क्षेत्र-१ हे. ९२ आर, पो.ख. क्षेत्र-००हे. २७आर, त्यासी एकुण क्षेत्र-२ हे.१८आर, आकार-१रू.-५०पैसे.

२) मौजे मेहेरगाव, ता.जि.धुळे येथील शेत गट नं. ३२५/२, क्षेत्र -१ हे. ९२आर, पो.ख.क्षेत्र-००हे. २६आर, त्यासी एकुण क्षेत्र-२ हे. १७आर, आकार-१रू. ५०पैसे.

३) मौजे मेहेरगाव, ता. जि. धुळे येथील शेत गट नं. ३२५/३, क्षेत्र - १ हे. ०० आर, पो.ख. क्षेत्र - ०० हे. २६ आर, त्यासी एकुण क्षेत्र- १ हे. २६ आर, आकार- ०रू. ८० पैसे.

४) मौजे मेहेरगाव, ता. जि. धुळे येथील शेत गट नं. ३२५ / ४, क्षेत्र - ०० हे. ९३ आर, पो.ख. क्षेत्र - ०० हे. २६ आर, त्यासी एकुण क्षेत्र - १ हे. १९ आर, आकार- ०रू.- ८० पैसे.

बॉम्बे रेग्युलेशन कायदा तखखख १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस दाखला (Legal Heirship Certificate) मिळणेकरीता अर्ज

ज्याअर्थी वरील अर्जदार क्र. १ ते २१ यांनी मयत कै. कानुबाई उर्फ कासुबाई काळु पाटील व कै.रुपाबाई उर्फ भगीरथबाई काशिनाथ देवरे यांचे वर नमुद मिळकतींवर नावे लागणेसाठी कायदेशिर वारस ठरवुन मिळणेकामी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट कलम २ अन्वये वारस दाखला मिळणेकामी सदरचा दि.कि. अर्ज धुळे येथील मे.दिवाणी न्यायाधीश सो. (क.स्तर) कोर्ट नं. २ यांचे न्यायालयात दाखल केलेला आहे.


मे.न्यायालयाने सदर अर्जावर पुढील चौकशीचे कामकाज चालविणे करीता चौ. ता. दि. १८/०८/२०२३ ही निश्चित केलेली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतकास, वारसांना व इतर संबंधीतांना या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, कोणास सदर अर्जाबाबत काही वाद, हरकत असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो. (क.स्तर) कोर्ट नं. २ यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी स्वतः किंवा वकीलांमार्फत हजर राहुन सदरकामी आपले म्हणणे, तक्रार, लेखी हरकत सादर करावी. त्याअर्थी मे. न्यायालयाने दिलेली व निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणचीही तक्रार, लेखी हरकत न आल्यास सदरकामी कोणाची काहीएक हरकत नाही, असे गृहित धरण्यात येवून सदर अर्जाचे कामी चौकशी होवून वरील अर्जदार यांना मयतांचे कायदेशिर वारस म्हणुन बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट अन्वये वारस दाखला (Legal Heirship Certificate) देण्याबाबत पुढील सुनावणी करण्यात येईल. त्यानंतर कोणाचीही, काहीएक हरकत ऐकुन घेतली जाणार नाही व ग्राहय धरण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी. सदर जाहिर नोटीस मे. न्यायालयाचे सहीशिक्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

स्थळ : धुळे
दि. ११/०७/२०२३

कामगिरी कारकुन, दिवाणी न्यायालय, धुळे — (शिक्का) — अधिक्षक, दिवाणी न्यायालय, धुळे

## मोक्षदा भंडारीचे राज्य माध्यमिक स्कॉलरशिप परीक्षेत सुयश

**लासलगाव ।** येथील श्री महावीर जैन विद्यालयाची विद्यार्थिनी कु मोक्षदा मिलिंद भंडारी हिने राज्य माध्यमिक स्कॉलरशिप परीक्षेत नासिक जिल्हात सातवा क्रमांक पटकावून घवघवीत यश मिळवले तसेच एन एम एम एस या परीक्षेतील जिल्हात ३७ वा नंबर मिळवत श्री महावीर विद्यालयाचे नाव लौकिकात भर टाकला आहे तिच्या यशासाठी तिने वडील मिलिंद श्रीराम भंडारी आई प्राजक्ता मिलिंद भंडारी तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक वृंदांचे मार्गदर्शन लाभल्याचे सांगितले.



## सिडकोत नामदेव महाराजांचा संजीवन समाधी सोहळा उत्साहात

**सिडको । प्रतिनिधी**

श्री क्षत्रिय अहिर शिंपी समाज, लक्ष्मीधवल समाज मंदिर, सिडको येथे नामदेव महाराज याच्या ६७३ वा संजीवन समाधी सोहळा निमित पालखी काढण्यात आली. यावेळी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सकाळी संत नामदेव महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन लक्ष्मीधवल समाज मंदिराचे अध्यक्ष शेखर निकुंभ यांच्या अध्यक्षतेखाली व प्रमुख अतिथी मुकूंद मांडगे, जिल्हाध्यक्ष राजेश जगताप, सिंधु खैरनार, सुनीता शिंपी, शकुंतला पवार यांच्या उपस्थितीत महाआरती करून महाप्रसाद वाटून अभिवादन



करण्यात आले. उपस्थितांचे स्वागत दीपक कपडणीस यांनी केले. पालखी मिरवणूक लक्ष्मीधवल समाज मंदिर येथून काढण्यात येऊन परिसरातील मुख्य मार्गावरून काढण्यात आली. पालखीचे ठिकठिकाणी पूजन करून भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतला. दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रम झाले. संत नामदेव महाराज की जय या जय जयकारात संजीवन समाधी सोहळा मोठ्या उत्साहात सपन्न झाला. सोहळा यशस्वीततेसाठी पदाधिकारी, भाविक, समाज बांधव यांनी परिश्रम घेतले.

अॅड. एम. व्ही. घरटे
निशाणी नं.६

**धुळे येथिल मे. सह दिवाणी न्यायाधिश सो., (क.स्त.) यांचे कोर्टात**

दि.कि.अर्ज नं.८४६/२०२३

१. श्रीमती पौर्णिमा राजेंद्र काकडे उ.व.-५६, धंदा-गृहीणी,
२. श्री. ललित राजेंद्र काकडे उ.व.-३४, धंदा-व्यापार,
३. श्री. अमित राजेंद्र काकडे उ.व.-३१, धंदा-व्यापार,
४. श्री. हेमंत राजेंद्र काकडे उ.व. २८, धंदा व्यापार,
सर्व रा. बालाजी मंदिर घर नं. १६९२, ग.नं. ४, धुळे. .....अर्जदार

**विरुध्द**

कै. राजेंद्र गोविंदप्रसाद काकडे
मयताचा पत्ता - घर नं. १६९२, ग.नं. ४, धुळे.
मृत्यु दिनांक : १४/०४/२०२१ ...सामनेवाला

**जाहिर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की,

अर्जदार क्र. १ ते ४ यांनी ते मयत कै. राजेंद्र गोविंदप्रसाद काकडे यांचे कायदेशीर वारस आहेत असे ठरवुन मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज मे. न्यायालयात दाखल केलेला आहे.

२. सदर अर्जाकामी कोणाचीही काही एक हरकत असल्यास त्यांनी दिनांक :३०/०८/२०२३ रोजी सकाळी १०.३० वाजता आपण स्वत: अथवा आपल्या वकीलांमार्फत हजर राहुन लेखी हरकत नोंदवावी.

३. उक्त दिवशी व वेळी कोणी हजर न झाल्यास कोणाचीही काहीही हरकत नाही असे समजुन पुढील आदेश पारीत करण्यात येईल. त्यानंतर कोणाचीही काही एक तक्रार ऐकुन घेतली जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस न्यायालयाचे शिक्यानिशी व माझे सहीनिशी आज दि.१४/०७/२०२३ रोजी प्रसिध्दीस दिली असे.

धुळे
दिनांक : १४/०७/२०२३ आदेशावरुन

कामगिरी कारकुन, दिवाणी न्यायालय (क.स्तर), धुळे — (शिक्का) — अधिक्षक, दिवाणी न्यायालय (क.स्तर), धुळे

# आम आदमी पार्टी नाशिकतर्फे 'सेल्फी विथ खड्डा' अभियान सुरु

**अन्यथा मनपा विरुद्ध आंदोलनाचा इशारा**

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिक महापालिकेच्या बांधकाम विभागाला मागील अनेक महिन्यांपासून आम आदमी पार्टीने नाशिक मधील रस्त्यावरील खड्डे बुजवण्यासंदर्भात अनेक निवेदने दिली आहेत. त्यानंतर स्मरणपत्रेही देण्यात आलीत. परंतु भ्रष्टाचाराने बरबटलेल्या अधिकाऱ्यांवर याचा कुठलाही परिणाम झालेला दिसत नसल्याने आम आदमी पार्टीने कालपासून संपूर्ण नाशिक शहरात चारही विभागात, प्रत्येक प्रभागात, प्रत्येक वार्डात 'सेल्फी विथ खड्डा' या अभियानास सुरुवात केली









आहे.

आम आदमी पार्टीअर्फे नाशिककरांनाही आवाहन करण्यात आले आहे की, आपल्याला जेथे खड्डा दिसेल त्या ठिकाणचा खड्ड्यासह आपला फोटो आम आदमी पार्टीच्या आमच्या हेल्पलाईन नंबर वर पाठवायचा आहे, हेल्पलाइन नंबर ८८०४० ००८०६ या अभियानानंतरही जर नाशिक मनपाच्या बांधकाम विभागाला जाग आली नाही तर, मोठ्या प्रमाणात उग्र जनआंदोलन करण्याचा ईशारा आम आदमी पार्टी नाशिकने दिला आहे. आम आदमी पार्टीने कालपासून संपूर्ण नाशिक शहरात चारही विभागात, प्रत्येक प्रभागात, प्रत्येक वार्डात 'सेल्फी विथ खड्डा' या अभियानास सुरुवात केली आहे.

## न्यूज कॉलम

### दहावीच्या परीक्षेची बैठक व्यवस्था जाहीर

**धुळे ।** ऑगस्टमध्ये होणाऱ्या दहावीच्या परीक्षेसाठी शहरातील मुख्य केंद्र छत्रपती शिवाजी हायस्कूल व उपकेंद्र जिजामाता कन्या विद्यालयातील बैठक व्यवस्था जाहीर झाली आहे. छत्रपती शिवाजी हायस्कूलमध्ये बैठक क्रमांक डी ०३६७२ ते डी ००४२०२ व उपकेंद्र जिजामाता कन्या विद्यालयात बैठक क्रमांक डी ००३३७२ ते डी ००३६७१ पर्यंतच्या परीक्षार्थीची बैठक व्यवस्था करण्यात आली आहे. मराठी माध्यमची परीक्षा जिजामाता कन्या विद्यालयात होईल. मराठी, ऊर्दू, हिंदी, इंग्रजी माध्यमाचे पेपर छत्रपती शिवाजी हायस्कूल (साक्री रोड, धुळे) येथे होतील.

### टायर फुटल्याने तरुणाचा मृत्यू

**धुळे ।** ट्रॅव्हल्सचा टायर फुटून अपघात झाला. यात बसमधील तरुणाचा मृत्यू झाला. मोहम्मद रिहान हसन असे त्याचे नाव आहे. मोहम्मद हसन ८ जुलैला ट्रॅव्हल्सने (जीजे १६, झेड ५५५५) मालेगाव येथून अक्कलकुवा येथे जात होता. यात मोहम्मद याच्या डोक्याला जबर मार लागला. त्याला रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले.

# बाजार सजला : रंगीबेरंगी छत्र्यांची दुनिया न्यारी

## बच्चे कंपनीसाठी खास आकर्षक पावसाळी वस्तू : लाकडी दांड्यांच्या छत्र्या पुन्हा बाजारात : खरेदीसाठी ग्राहकांची होतेय गर्दी

**पुरुषोत्तम पाटील । धुळे**

पाऊस सुरू झाला की आठवण होते ती छत्रीची. मग कपाटात, अडगळीच्या ठिकाणी असलेल्या छत्रीचा शोध सुरू होतो. नाहीतर नवीन छत्र्यांची खरेदी होते. आजोबांची लाकडी दांड्यांची लांब छत्री असो वा पर्समध्ये मावणारी टू फोल्ड, थ्री फोल्ड छत्री, सर्वांनाच आपल्या आवडीनुसार छत्री खरेदी करावीशी वाटते. सध्या विविधरंगी छत्र्या ग्राहकांच्या पसंतीस उतरत आहेत. पूर्वी केवळ महिलांच्या हातात दिसणाऱ्या रंगीबेरंगी, फुलाफलांच्या छत्र्या आता पुरुषांच्याही हाती दिसू लागल्या असून त्यांच्याकडूनही लहान- मोठ्या छत्र्यांची मागणी होत आहे. पावसाळा सुरू होताच छत्रीचा प्रवास आणि रंगीबेरंगी छत्र्यांची जादू आजही कायम आहे. उन्हापासून बचावासाठी छत्रीचा वापर होत असला तरी तिची खरी निकड भासते ती पावसाळ्यात. वापरण्यास व सांभाळण्यास सोयीची असलेली ही छत्री अनेक रंगरुपात बाजारात मिळू लागली आहे. हमखास विसरली जाणारी अशी ही वस्तू असली तरी प्रत्येक घरात आवर्जून खरेदी होते.

पावसाळ्यासाठी बाजारात दरवर्षी वेगवेगळ्या प्रकारच्या छत्र्या आणि रेनकोटचा ट्रेंड पाहायला मिळतो. यंदाही बाजारात छत्री आणि रेनकोटमध्ये नवनवीन प्रकार आल्याचे दिसून येत आहे. सध्या बाजारात ऑटोमॅटिक छत्री सर्वांचे लक्ष वेधत आहेत. ही छत्री बटण दाबताच उघडते आणि बटण दाबताच बंद होते. त्यामुळे या छत्रीची बाजारात सध्या चलती असल्याची माहिती विक्रेत्यांनी दिली.

गेल्या काही दिवसांपासून जिल्ह्यात पावसाचे आगमन झाले आहे. त्यामुळे बाजारात सध्या रेनकोट, छत्र्या, पावसाळी टोप्या, ताडपत्री, प्लास्टिक पेपर आणि अन्य साहित्य खरेदी करण्यासाठी नागरिकांची झुंबड उडाली आहे. या खरेदीसाठी धुळ्यातील पाच कंदील, आग्रा रोड, जुनी महानगर पालिका, संतोषी माता चौक, अश्या विविध ठिकाणी विक्रते दाखल झाले आहेत.

यंदा बाजारात रंग बदलणारी छत्री, डबल लेअर, डबल कोटेड, ऑटोमॅटिक छत्री अशा अनेक वेगवेगळ्या प्रकारच्या छत्र्या दाखल झाल्याचे पाहायला मिळत आहेत. यात आकर्षण असलेली रंग बदलणारी छत्री ही पावसात घेऊन गेल्यानंतर रंग बदलते. त्यामुळे या रंग बदलणाऱ्या छत्रीची सध्या बाजारात चर्चा आहे. ही छत्री खरेदी करण्याकडे ग्राहकांचा जास्त कल असल्याचे विक्रेत्यांकडून सांगण्यात आले. तसेच पारदर्शक छत्र्याही सध्या बाजारात विविध प्रकारच्या छत्र्या पाहायला मिळत आहेत. या सर्व छत्र्या अगदी ३०० रुपयांपासून ते दोन हजारांपर्यंत बाजारात विक्रीसाठी उपलब्ध आहेत.







### चिमुकल्यांत कार्टून्स रेनकोटची चलती

कार्टून्स म्हणजे लहान मुलांसाठी आवडतीचा विषय आहे. आपल्या आवडत्या कार्टूनचे चित्र असणारा ड्रेस किंवा कोणतीही गोष्ट वापरणे हे प्रत्येक लहान मुलाला आवडते. यासाठी पावसाळ्यात लहान मुलांच्या रेनकोटमध्ये विविध कार्टून्सचा ट्रेंड पाहायला मिळत आहे. यामध्ये डोरेमॉन, छोटा भीम, मोटू पटलू, स्पायडर मॅन, तर लहान मुलींसाठी डोरा, बार्बीडॉल, सिंड्रेला यांचे छायाचित्र असलेले रेनकोट बाजारात उपलब्ध झाले आहेत. या रेनकोटची विक्री ३०० ते ६०० रुपयांपर्यंत असल्याची माहिती विक्रेत्यांनी दिली.

### ताडपत्री खरेदीची लगबग

जिल्ह्यात अनेक कामगार व गोरगरीब झोपडपट्टी अथवा चाळीमध्ये राहतात. दरवर्षी पावसाच्या पाण्यापासून संरक्षण करण्यासाठी ते प्लास्टिकचे छप्पर म्हणजेच ताडपत्रीचा वापर करत आहेत. शहरातील आदी भागांत मोठ्या संख्येने प्लास्टिक ताडपत्रीची विक्री सुरू असून या व्यवसायातून लाखो रुपयांची उलाढाल होते. प्लास्टिक कापडामध्ये साधे जाड स्वरूपाचे प्लास्टिक, सुती कापडाचा अंश असलेले प्लास्टिक, ताडपत्री असे विविध प्रकार असतात. सहा फूट ते बारा फूट उंचीचे प्लास्टिक बाजारात विकण्यास असून ८० रुपये मीटर ते १६०-२०० रुपये मीटरपर्यंत हे विकले जात आहे.

**इंधन, वाहतूक, मेटल तसेच कापडाचे वाढलेले भाव यामुळे पावसाळी साहित्यात दरवाढ झाली आहे, पण पावसाळ्यात या वस्तू घेणे गरजेचे असल्याने ग्राहकांचा प्रतिसाद वाढेल अशी अपेक्षा आहे.**

**- व्यापारी**

### छत्र्यांची जादू आजही कायम

**पाऊस सुरू झाला की आठवण होते ती छत्रीची. मग कपाटात, अडगळीच्या ठिकाणी असलेल्या छत्रीचा शोध सुरू होतो. नाहीतर नवीन छत्र्यांची खरेदी होते. आजोबांची लाकडी दांड्यांची लांब छत्री असो वा पर्समध्ये मावणारी टू फोल्ड, थ्री फोल्ड छत्री, सर्वांनाच आपल्या आवडीनुसार छत्री खरेदी करावीशी वाटते. सध्या विविधरंगी छत्र्या ग्राहकांच्या पसंतीस उतरत आहेत. पूर्वी केवळ महिलांच्या हातात दिसणाऱ्या रंगीबेरंगी, फुलाफलांच्या छत्र्या आता पुरुषांच्याही हाती दिसू लागल्या असून त्यांच्याकडूनही लहान-मोठ्या छत्र्यांची मागणी होत आहे. पावसाळा सुरू होताच छत्रीचा प्रवास आणि रंगीबेरंगी छत्र्यांची जादू आजही कायम आहे.**

### साहित्य किंमत रुपये

- मोठी छत्री ३०० ते ४०० रु.
- लहान छत्री १५० ते ३०० रु.
- फोल्डिंग छत्री ४०० ते ६०० रु.
- रेनकोट साधा ३०० ते ५०० रु
- ट्रान्सपरंट रेनकोट ३०० ते ४०० रु.
- चेन रेनकोट ५०० ते ९०० रु.
- मिड टॉप ५०० ते १ हजार रु.
- लाँग रेनकोट ७०० ते १ हजार ५०० रु.

# जैताणे येथे संत सावता महाराज पुण्यतिथी साजरी

**जैताणे । प्रतिनिधी**

येथील संत सावता चौक येथे वारकरी संप्रदायातील संत शिरोमणी सावता माळी यांच्या पुण्यतिथी निमित्ताने माळी समाज बांधवांनी पुण्यतिथी उत्साहात साजरी केली. संत सावता महाराज यांच्या फलकास जेष्ठ कार्यकर्ता बुधा हरी जाधव यांनी श्रीफळ अर्पण केले. मा. बालकल्याण सभापती प्रतिनिधी दौलत शेंपा भदाणे यांनी श्रीफळ व पुषगुच्छ अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

कांदा मुळा भाजी अवघा विठाई माझी! असे म्हणत त्यांना आपल्या कामातच विठोबा दिसत होता. आपल्या कामातच देव शोधण्याचा संदेश त्यांनी जगाला दिला आहे.



संत सावता महाराज पुण्यतिथीच्या निमित्ताने सार्वजनिक पूजा व आरतीचे आयोजन करण्यात आले.

त्या प्रसंगी उपस्थित माजी आरोग्य सहाय्यक रामदास भदाणे, ज्येष्ठ नागरिक गुलाब खैरनार, चिंतामण भदाणे, राजेंद्र मिस्त्री सोनवणे, शांताराम वाघ, निंबा खैरनार, मोतीलाल चौधरी, नाना खलाणे यांनी विनम्र अभिवादन केले. शरद गवळे, धनराज भदाणे, प्रदिप भदाणे यांनी कार्यक्रम यशस्वी केला.

# जिल्हा स्तरावरील बॅडमिंटन स्पर्धेचा जिल्हा क्रिडा संकुलात शुभारंभ

**धुळे । प्रतिनिधी**

महाराष्ट्र बॅडमिंटन असोसिएशन, अल्ट्रा टेक सिमेंट व अरिहंत ज्वेलर्स यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच धुळे जिल्हा व धुळे तालुका बॅडमिंटन असोसिएशन तर्फे आयोजित जिल्हा स्तरावरील बॅडमिंटन स्पर्धेचा शुभारंभ आज जिल्हा क्रिडा संकुलातील इनडोअर हॉल मध्ये मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. पंधरा, सतरा व एकोणीस वर्षे खालील वयोगटातील धुळे जिल्ह्यातील विद्यार्थी विद्यार्थीनी मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत. या स्पर्धेचा रविवारी समारोप होणार आहे.

स्पर्धेच्या औपचारिक शुभारंभ प्रसंगी एस एस व्ही पी एस महाविद्यालयाचे समन्वयक प्रमोद पाटील, अल्ट्रा टेक सिमेंट चे व्यवस्थापक दिपक जोशी, अरिहंत ज्वेलर्स चे विक्रम राठोड, प्रवीण भोसले, सेक्रेटरी दिनेश पाटील, बापूसाहेब देवरे अभियांत्रिकी चे आनंद कुलकर्णी आदी उपस्थित होते. दिप प्रज्वलन करून व श्रीफळ वाढवून स्पर्धेचा शुभारंभ करण्यात आला. श्री प्रमोद पाटील यांनी खेळाडूंना मार्गदर्शन करताना शिक्षणा सोबतच आवडीच्या खेळात नैपुण्य मिळवण्याचे आवाहन केले. तसेच स्पर्धेतील यशासाठी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. श्री दिपक जोशी यांनी खेळाडूंना मार्गदर्शन करतांना खेळाडूंनी स्पर्धेतील यशासाठी जास्तीत जास्त सराव करण्यावर भर दिला तसेच स्पर्धेतील यश अपयश खिलाडू वृत्तीने स्विकारण्याचे आवाहन केले व स्पर्धेतील सहभागा बद्दल खेळाडूंचे कौतुक करुन यशासाठी शुभेच्छा दिल्या. धुळे जिल्हा बॅडमिंटन असोसिएशनचे सचिव दिनेश पाटील यांनी प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले. या स्पर्धेसाठी पंच म्हणून राहुल साळी, गौरव कुमार, रोशन लोहार, शुभम अमृतकर, निखिल पाटील, उर्वी शिंदे काम पहात आहेत. तसेच स्पर्धेच्या यशस्वीपणे संपन्न होण्यासाठी उमेश पटेल, तुळशीराम पंड्या, धनंजय पाटील, प्रशांत भामरे आदी परिश्रम घेत आहेत.




# भडणे ते संत सावता महाराज पुण्यतिथी साजरी

**चिमठाणे । प्रतिनिधी**

शिंदखेडा तालुक्यातील भडणे येथे संत सावता महाराज पुण्यतिथी साजरी करण्यात आली.

भडणे येथील प्रगतशील शेतकरी व माजी सरपंच तसेच धुळे जिल्हा माळी समाजाचे जिल्हाध्यक्ष पांडुरंग पुन्हा माळी यांचे निवासस्थानी माळी समाजाच्या आराध्य दैवत संत शिरोमणी सावता महाराज यांच्या पुण्यतिथी सालाबादप्रमाणे या वर्षीही उत्साहात साजरी करण्यात आली. संत सावता महाराज यांच्या प्रतिमेची पूजा व भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी सकाळी गावातील ग्रामस्थ व भजनी मंडळ मोठ्या संख्येने उपस्थित होते. रात्री ह भ प अतुल महाराज जैतानेकर यांच्या कीर्तनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.



यावेळी ग्रामस्थ व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# एमएसडब्ल्यू अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्याचे आवाहन

**नाशिक । प्रतिनिधी**

मराठा विद्या प्रसारक समाजाच्या समाजकार्य महाविद्यालयातील मास्टर ऑफ सोशल वर्क (एमएसडब्ल्यू) या अभ्यासक्रमाची शैक्षणिक वर्ष २०२३ - २५ साठीची प्रवेश परीक्षा मंगळवार दि. ११ जुलै ते गुरुवार दि. १३ जुलै या कालावधीत समाजकार्य महाविद्यालय, आयएमआरटी, रावसाहेब थोरात हॉल समोर, मॅरेथॉन चौक, गंगापूर रोड, नाशिक येथे होणार आहे.

कोणत्याही शाखेचा पदवीधर या परीक्षेसाठी पात्र आहे. ज्यांनी पदवीच्या शेवटच्या वर्षाची परीक्षा दिली आहे किंवा देत आहे असे विद्यार्थी देखील या प्रवेश परीक्षेस पात्र आहेत. अशी माहिती मविप्र संस्थेचे सरचिटणीस ड. नितीन ठाकरे व प्राचार्य डॉ. विलास देशमुख यांनी दिली आहे.

सामाजिक क्षेत्रात करियर करण्याची संधी या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून पदवीधर विद्यार्थ्यांना मिळू शकते. मास्टर ऑफ सोशल वर्क हा दोन वर्षाचा पूर्णवेळ अभ्यासक्रम असून त्यामुळे औद्योगिक, आरोग्य, सामाजिक व शासकीय सेवेत जाण्याची चांगली संधी पदवीधरांना उपलब्ध होऊ शकते. तरी इच्छुक विद्यार्थ्यांनी १० जुलै पर्यंत महाविद्यालयात येऊन १० ते ५ या वेळेत परीक्षा फॉर्म भरावेत. अधिक माहितीसाठी ०२५३-२३११४१७ या क्रमांकावर संपर्क करावा.

# जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या मैदानावर वृक्षारोपण

**धुळे । प्रतिनिधी**

मुंबई-आग्रा महामार्गाजवळ असलेल्या जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वरखेडी-कुंडाणे येथील मैदानावर 'झाडे लावा, झाडे जगवा' या उपक्रमांतर्गत शनिवार दि. १५ जुलै रोजी वृक्षारोपणाचा कार्यक्रम संपन्न झाला. धुळे जिल्हा क्रिकेट असोसिएशन, बिल्डर्स असोसिएशन, क्रेडाई, कन्सल्टिंग इंजिनिअर्स असोसिएशन, रोटरी क्लब ऑफ धुळे क्रॉस रोड यांच्या संयुक्त विद्यमाने व हॉटेल कृष्णाईच्या सौजन्याने या वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे प्रदेश सदस्य, जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे वरिष्ठ सल्लागार, माजी आमदार राजवर्धन कदमबांडे होते.

महाराष्ट्रगीताने कार्यक्रमाला सुरुवात झाली. पियुष कंस्ट्रक्शनचे संजय देसले यांनी कार्यक्रम आयोजनाची भूमिका प्रास्ताविकातून मांडली. ॲड. कुंदन पवार यांनी मनोगत व्यक्त केले. राष्ट्रगीतानंतर मैदानालगत मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करुन रोपांना पाणी देण्यात आले. आयोजकांतर्फे देण्यात आलेल्या न्याहरीचा सर्वांनी आस्वाद घेतला. याप्रसंगी जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे सचिव संदीप शिंदे, विजय पंजाबी, जगदिश गायकवाड, कैलास पाटील, अनिल वाडेकर, लहू पाटील, सुशील पोपली, योगीराज मराठे, प्रकाश पाटील यांच्यासह अन्य मान्यवर व क्रीडाप्रेमी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन जगदिश देवपूरकर यांनी केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे प्रदेश सदस्य, जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे वरिष्ठ सल्लागार, माजी आमदार राजवर्धन कदमबांडे होते. महाराष्ट्रगीताने कार्यक्रमाला सुरुवात झाली. पियुष कंस्ट्रक्शनचे संजय देसले यांनी कार्यक्रम आयोजनाची भूमिका प्रास्ताविकातून मांडली.



शारदा शैक्षणिक व सामाजिक संस्था
Admission Open
विद्याधन महाविद्यालय, वलवाडी, धुळे
NAAC Accredited 'B' Grade – वडेल रोड, एमएसईबी जवळ, वलवाडी, धुळे
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापिठ जळगाव, कोड नं. 200111
B.Sc. | B.C.A | M.M.S./M.C.M.
डिप्लोमा उत्तीर्ण झालेल्यांना S.Y.B.Sc. ला प्रवेश SC/ST साठी मोफत
संपर्क: प्रा.ललिता निकम: 8862044791, प्रा.जागृती पाटील: 7887934365
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापिठ, नाशिक कोड नं. 5299A
B.A., B.C.A, B.Sc., M.A., M.C.A., M.B.A.
सर्व अभ्यासक्रमांना सत्यप्रतीवर (झेरॉक्स) प्रवेश मिळेल.
प्रा.हर्षल पाटील: 9421283577, श्री.नितेश पाटील: 9922116438, प्रा.भूषण पाटील: 7709100798
ज्ञानगंगा घरोघरी
शासन मान्यताप्राप्त एम.एस.बी.टी.ई. मुंबई संलग्नीत कोड नं.2053
P.G.D.M.L.T. Advanced Diploma in Medical Laboratory Technology
पात्रता – बीएस्सी केमेस्ट्री, बॉटनी, झुऑलॉजी, मायक्रो बायोलॉजी/ बी.फार्म/बी.ए.एम.एस./बी.डी.एस./एम.बी.बी.एस.
संपर्क : प्राचार्य डॉ.के.बी.पाटील – 9422288518, सौ.शारदा पाटील – 9423496344
प्राचार्य डॉ.आर.बी.पवार: 9420375735,
प्रा.डॉ.योगेश बोरसे: 9423378936, श्री. हर्षल पाटील: 9421283577

# कलाकारांचा गुण गौरव सोहळा उत्साहात संपन्न



धुळे। शहरात अखिल भारतीय नाट्य परिषद धुळे शाखा व लोकमंगल कलाविष्कार सह संस्था नाशिक विभाग शाखा धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने गुण गौरव सोहळा संपन्न झाला. यावेळी अखिल भारतीय नाट्य परिषद नियमायक मंडळ सदस्य चंद्रशेखर पाटील यावेळी मार्गदर्शन करताना म्हणाले महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील कलाकारांना चांगल्या दर्जाचे नाट्यगृह उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. आणि त्यांचा नाट्य रसिकांना देखील आस्वाद घेता येणार आहे. तसेच जिल्ह्यात देखील लवकर नवीन सदस्य नोंदणी देखील केली जाईल. आणि कार्यालय देखील उपलब्द करण्यात येणार आहे. तरी जास्तीत जास्त कलाकारांनी नाट्य परिषदेचे सदस्य व्हावे असे देखील म्हणाले. धुळे शहरात देखील नागरिकांसाठी नाटकांचे प्रयोग आयोजित करून आवड निर्माण केली जाते आहे. मुंबई नाटकांसाठी जास्तीत जास्त कलाकारांना संधी मिळण्यासाठी मी प्रयत्न करेल असे देखील देखील म्हणाले. प्रा.अनिल सोनार यांनी यावेळी आयोजित केलेल्या कार्यक्रमाचे कौतुक केले. त्यामुळे या कलाकारांना प्रोत्साहन मिळाले. नाटकाकडे कसे पाहावे.तसेच त्यांनी त्यांच्या विविध नाटकांच्या प्रयोगाच्या अनुभव सांगितले. तसेच कलाकारांना मार्गदर्शन देखील केले. सारांश भावसार यांनी देखील यावेळी कलाकारांना शुभेच्छा देत कौतुक केले.महाराष्ट्र शासनाचे पुरस्कार :-१७ वी महाराष्ट्र बालनाट्य स्पर्धेत पडसाद या नाटकात भूमिकेसाठी अभिनय गुणवत्ता प्रमाणपत्र पारितोषिक नारायणी मनोज सोनार,१८ वी महाराष्ट्र बालनाट्य स्पर्धेत एप्रिल फुल या नाटकात भूमिकेसाठी अभिनय गुणवत्ता प्रमाणपत्र पारितोषिक नारायणी वेदांत पंकज बागुल, ६० वी महाराष्ट्र राज्य हौशी नाट्य स्पर्धेत कात या नाटकात भूमिकेसाठी अभिनय गुणवत्ता प्रमाणपत्र पारितोषिक राहुल विजय मंगळे, ६१ वी महाराष्ट्र राज्य हौशी नाट्य स्पर्धेत प्रतिकार या नाटकात भूमिकेसाठी अभिनय गुणवत्ता प्रमाणपत्र पारितोषिक केतकी प्रशांत पंचभाई, ४ थी महाराष्ट्र राज्य दिव्यांग बालनाट्य स्पर्धेत विधी या नाटकात भूमिकेसाठी अभिनय गुणवत्ता प्रमाणपत्र पारितोषिक लकी दीलाजा यांना महाराष्ट्र शासनाच्या वतीने पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.उपस्थित होते. पुरस्कारांचे मानकरी :- राजेश बिहाडे, विशाल महाले, विनोद फरताडे, हर्षल मराठे, शितल मराठे, संजय विसपुते, कुणाल खैरनार, सागर चांगरे, रोहित भारत, आशिष कासार, हितेश भामरे, महिर पाटील, शिवांजली सापे, मल्हार सापे, रजत परदेशी, वृषभ अहिरे, माधुरी परदेशी, प्रतिक वाघ, स्वराज सावंत, कुणाल शिंदे, किरण जाधव, सिद्धांत बागुल, विलास वाडिले, चेतन उपाध्याय, तन्मय बाविस्कर, ओम कासार, पुजा चौहान, अथर्व कुंभारे, धनंजय दिक्षित, हर्षल परदेशी, अभिजित कबाडे, ज्योती चौहान मंगळे, सिद्धांत मंगळे, सुजय भालेराव यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

संकलन : दिपक वाघ

दैनिक
# लक्ष महाराष्ट्र

सोमवार, दि. १७ जुलै २०२३






# नाशिक येथे 'शासन आपल्या दारी' हा कार्यक्रम संपन्न

































नाशिक । लोकांच्या दारोदारी सरकार

फिरतंय, अशी टीका काही विरोधक करू लागले आहेत. जे घरी बसून काम करतात, त्यांना जनताच घरी बसवते, असा टोला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचे नाव न घेता लगावत विरोधकांवर हल्लाबोल केला आहे. दरम्यान आगामी स्थानिक स्वराज्य संस्था तसेच लोकसभा विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुती सरकारने काल जोरदार शक्ती प्रदर्शन केले असल्याचे यातून दिसून येते. शासन आपल्या दारी या उपक्रमाच्या निमित्ताने नाशिक दौऱ्यावर आलेले मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नाशिक शहर व जिल्ह्यासाठी महत्वाच्या असणाऱ्या तसेच रखडलेल्या अनेक प्रकल्पांबाबत घोषणा करीत ते मार्गी लावण्याची आश्वासने दिली. यात प्रामुख्याने रखडलेला नाशिक - पुणे हाय स्पीड रेल्वे मार्ग, नाशिक शहारातील निओ मेट्रो प्रकल्प, नदीजोड प्रकल्प, कुंभमेळा कोरिडॉर, सर्क्युलर कॉरिडॉर आदी प्रकल्प मार्गी लावण्याची आश्वासने नव्याने देण्यात आली. लागेल, असे आश्वासन दिले. राज्यातील ७५ लाख लाभार्थ्यांच्या चेहऱ्यावर या अभियानाच्या माध्यमातून हास्य फुलले आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी येथे केले.